दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३५० I रविवार ०४ ऑक्टोबर २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## अहिल्यानगरमध्ये २७० पाणीसाठ्यात डेंग्यूच्या आळ्या!




**अहिल्यानगर :** महापालिकेच्या 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियाना'त आत्तापर्यंत आरोग्य कर्मचाऱ्यांनी ९ हजार घरांना भेटी दिल्या. २८ हजार पाणीसाठ्यांची तपासणी केली. त्यापैकी २७० पाण्यासाठे दूषित आढळले, तेथे डेंग्यूच्या आळ्या निदर्शनास आल्यानंतर तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या. आत्तापर्यंत शहरात डेंग्यूचे सहा रुग्ण आढळले आहेत.महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी ही माहिती दिली. महापालिका दर शनिवारी एका प्रभागात डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियान राबवते. तेथे जनजागृती करून नागरिकांना स्वच्छता व डास प्रतिबंधासाठी जनजागृती केली जाते. या अभियानाच्या दहाव्या आठवड्यानिमित्त आज, शनिवारी बोल्हेगाव भागातील गांधीनगर परिसरात जनजागृती व पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात आली.

### महत्त्वाचे..

## पेट्रोल ५, डिझेल ३ रुपयांनी महागले

### दरवाढ आजपासून लागू

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या आणि शुद्ध पेट्रोलियम उत्पादनांच्या किमतीत वाढ झाल्याने खासगी इंधन विक्रेती नायरा एनर्जीने



पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ केली आहे.

पेट्रोलच्या दरात प्रतिलिटर ५ रुपये, तर डिझेलच्या दरात ३ रुपयांची वाढ करण्यात आली असून, नवे दर ३ ऑक्टोबरपासून तातडीने लागू झाले आहेत. नायरा एनर्जीच्या देशभरातील ७ हजार १०८ पेट्रोल पंपांवर ही दरवाढ लागू करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय तेल बाजारातील वाढत्या किमतीमुळे इंधन विक्रेत्यांच्या नफ्यावरील दबाव वाढला आहे. देशातील सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांच्या तुलनेत खासगी इंधन विक्रेत्यांच्या विक्री किमती आणि वाढत्या खर्चातील तफावतही वाढत आहे. या पार्श्वभूमीवर नायराने पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी पश्चिम आशियातील संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय तेलपुरवठ्यावर परिणाम झाल्यानंतर नायराने २६ मार्च रोजी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात अनुक्रमे ५ आणि ३ रुपये प्रतिलिटर वाढ केली होती.

# महायुतीचा तिढा सुटला; 'मविआ'चा पेच कायम

## पुणे शिक्षक मतदारसंघ भाजपच्या वाट्याला; कौस्तुभ गावडे रिंगणात

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, महायुतीतील जागावाटपाचा महत्त्वाचा टप्पा पार पडला आहे. पुणे शिक्षक मतदारसंघावर भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही घटक पक्षांचा दावा असल्याने गेल्या काही दिवसांपासून मोठी रस्सीखेच सुरू होती. अखेर ही जागा भाजपच्या वाट्याला गेली असून कौस्तुभ गावडे यांना उमेदवारी देण्यात आल्याचे वृत्त आहे.**




महायुतीच्या जागावाटपानुसार पुणे पदवीधर आणि नागपूर पदवीधर भाजप, अमरावती शिक्षक शिवसेना (शिंदे गट), तर छत्रपती संभाजीनगर पदवीधर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) लढवणार असल्याची माहिती आहे. पुणे शिक्षक जागा भाजपकडे गेल्यानंतर मित्रपक्षांतील इच्छुकांची नाराजी दूर करण्याचे आव्हान महायुतीसमोर आहे.

दरम्यान, पुणे शिक्षक मतदारसंघासाठी भाजपकडून कौस्तुभ गावडे यांचे नाव पुढे आले आहे. शिक्षकांचे प्रश्न, जुनी पेन्शन योजना आणि प्रलंबित मागण्यांवर काम करण्याचा भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.दुसरीकडे, महाविकास आघाडीत जागावाटपाचा पेच कायम आहे. काँग्रेसने नागपूर पदवीधर तसेच पुणे आणि अमरावती शिक्षक मतदारसंघांसाठी उमेदवार जाहीर केल्यानंतर मित्रपक्षांमध्ये नाराजी निर्माण झाली. शनिवारी झालेल्या बैठकीत पाचही जागांवर एकमत झाले नसल्याचे वृत्त असून रविवारी पुन्हा चर्चा होणार आहे.

### निवडणूक कार्यक्रम

अधिसूचना : २९ सप्टेंबर २०२६
उमेदवारी अर्जाची अंतिम तारीख : ६ ऑक्टोबर
अर्जांची छाननी : ७ ऑक्टोबर
अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख : ९ ऑक्टोबर
मतदान : २३ ऑक्टोबर, सकाळी ८ ते दुपारी ४
मतमोजणी व निकाल : २७ ऑक्टोबर

### काँग्रेसच्या उमेदवार घोषणेनंतर मित्रपक्ष नाराज; उद्या पुन्हा बैठक

**विधान परिषद निवडणुकीसाठी काँग्रेसने नागपूर पदवीधर – अभिजीत वंजारी, पुणे शिक्षक – जयंत आसगावकर आणि अमरावती शिक्षक – आदिती पोहोरे यांची नावे जाहीर केली. मित्रपक्षांशी अंतिम चर्चा होण्यापूर्वीच नावे जाहीर केल्याने महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाकडून नाराजी व्यक्त करण्यात आली. शनिवारी झालेल्या बैठकीत पाच जागांच्या जागावाटपावर चर्चा झाली; मात्र अंतिम तोडगा निघाला नसल्याचे वृत्त आहे. रविवारी पुन्हा चर्चेची फेरी होणार असल्याने मविआचे अंतिम जागावाटप कसे होते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.**

### महायुतीचे जागावाटप

**पुणे पदवीधर व शिक्षक : भारतीय जनता पक्ष**
**नागपूर पदवीधर : भारतीय जनता पक्ष**
**अमरावती : शिवसेना (शिंदे गट)**
**छत्रपती संभाजीनगर : राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)**

# एका क्लिकवर मिळणार रुग्णवाहिका!

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** गंभीर आजारपण किंवा अपघाताच्या वेळी रुग्णवाहिका मिळवण्यासाठी होणारी धावपळ कमी करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलण्याची तयारी केली आहे. मोबाईलवरून चारचाकी किंवा दुचाकी वाहन मागविण्याच्या धर्तीवर एका क्लिकवर जवळची रुग्णवाहिका उपलब्ध करून देणारे डिजिटल व्यासपीठ तयार करण्याचा प्रस्ताव परिवहन आणि आरोग्य विभागाच्या विचाराधीन आहे.

**'ॲम्ब्युलन्स बुकिंग'साठी डिजिटल प्लॅटफॉर्मचा प्रस्ताव**



**■ सध्या रुग्णवाहिकेसाठी नागरिकांना आपत्कालीन हेल्पलाइन किंवा स्थानिक रुग्णवाहिका चालकांशी संपर्क साधावा लागतो. अनेकदा उपलब्ध वाहन शोधण्यासाठी अनेक फोन करावे लागतात. प्रस्तावित डिजिटल प्रणालीमुळे ही प्रक्रिया एकाच व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.**

प्रस्तावित प्रणालीद्वारे नागरिकांना त्यांच्या परिसरातील उपलब्ध रुग्णवाहिकेची माहिती मोबाईलवर मिळणार आहे. रुग्णवाहिकेचे थेट स्थान, अपेक्षित पोहोचण्याचा वेळ आणि सेवा शुल्क याची माहितीही उपलब्ध करून देण्याचा विचार आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका शोधण्यासाठी अनेक ठिकाणी फोन करण्याची गरज कमी होऊन मदत मिळण्याचा वेळ वाचण्याची अपेक्षा आहे.राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये नोंदणीकृत असलेल्या रुग्णवाहिकांची माहिती या डिजिटल प्रणालीशी जोडली जाणार आहे. सरकारी तसेच खासगी रुग्णालये आणि खासगी रुग्णवाहिका चालकांना या व्यासपीठावर सहभागी करून घेण्याचा विचार आहे. खासगी रुग्णवाहिकांची या प्रणालीवर नोंदणी अनिवार्य करण्याची शक्यताही तपासली जात आहे.

प्रणालीवर नोंदणी होणाऱ्या रुग्णवाहिकांसाठी काही किमान वैद्यकीय सुविधा आणि सेवा निकष निश्चित केले जाऊ शकतात. प्रवासादरम्यान प्राथमिक वैद्यकीय मदत देऊ शकणाऱ्या रुग्णवाहिकांचा समावेश करण्याबरोबरच काही सेवांमध्ये डॉक्टर किंवा परिचारिका उपलब्ध करून देण्याबाबतही विचार सुरू आहे.रस्ते अपघातानंतरचा पहिला तास उपचाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या काळात रुग्णाला योग्य वैद्यकीय मदत मिळाल्यास उपचारांना मोठी मदत होऊ शकते. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत उपलब्ध रुग्णवाहिका तातडीने शोधता यावी आणि तिचा प्रतिसादाचा वेळ कमी करता यावा, हा या प्रस्तावामागील प्रमुख उद्देश आहे.दरम्यान, हा प्रस्ताव सध्या नियोजनाच्या टप्प्यावर असून अंतिम निर्णय झालेला नाही. सविस्तर नियमावली, सेवा निकष आणि अंमलबजावणीची पद्धत निश्चित झाल्यानंतरच ही डिजिटल रुग्णवाहिका सेवा प्रत्यक्षात सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे.

# दरोड्याच्या तपासावर आक्षेप

## नान्नजमध्ये पीडित कुटुंबाचा ५ महिन्यांच्या बाळासह रास्तारोको

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** तालुक्यातील नान्नज येथील मनीषा श्रीमंत गोरे यांच्या घरात घडलेल्या १४ लाख ६३ हजार रुपयांच्या दरोडा प्रकरणाचा पोलिसांनी योग्य तपास न करता चुकीच्या कलमांन्वये गुन्हा नोंदविल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पोलिसांच्या या मनमानी व निष्काळजी कारभाराच्या निषेधार्थ शनिवारी (दि. ३ ऑक्टोबर) रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास फीर्यादी व आईने आपल्या ५ महिन्यांच्या दोन चिमुकल्या बाळासह संपूर्ण कुटुंब नान्नज व्यापारी असोसिएशन व ग्रामस्थांच्या साथीने जामखेड-करमाळा राज्यमार्गावर नान्नज येथे तब्बल तीन तास रास्ता रोको आंदोलन छेडले. अखेर पोलीस प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, शुक्रवारी (दि. २ ऑक्टोबर) रात्री दोन वाजेच्या सुमारास नान्नज येथील मनीषा गोरे यांच्या घरात अज्ञात चोरट्यांनी जबरी चोरी करत सोन्या-चांदीचे दागिने व रोकड असा एकूण १४ लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. या घटनेनंतर फिर्यादी मनीषा गोरे तक्रार नोंदवण्यासाठी जामखेड पोलीस ठाण्यात गेल्या असता, तेथील पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा जाधव यांनी योग्य सहकार्य केले नाही. उलटपक्षी,



पीडित महिलेला मानसिक त्रास देत, घाईगडबडीत चुकीच्या कलमांनुसार ऑनलाईन एफआयआर नोंदवून तिच्या सह्या घेतल्याचा गंभीर आरोप गोरे कुटुंब आणि ग्रामस्थांनी केला आहे.

या अन्यायाविरोधात आक्रमक झालेल्या पीडित महिला, ५ महिन्यांच्या दोन्ही जुळी बाळे, गोरे कुटुंब आणि नान्नजच्या ग्रामस्थांनी शनिवारी सकाळी नऊ वाजता जामखेड-करमाळा रस्त्यावर गोरे यांच्या घरासमोर एकत्र येत रस्त्यावरच ठिय्या मांडला. आंदोलनप्रसंगी बोलताना फिर्यादी मनीषा गोरे यांनी सांगितले की, प्रत्यक्ष घटनेच्या वेळी एकूण सहा दरोडेखोर उपस्थित होते, असे स्पष्ट सांगूनही पोलिसांनी दबावाखाली गुन्ह्यात केवळ चारच आरोपी दाखवले. एवढेच नव्हे तर तुमचे सोने कमी गेले आहे, तुम्ही जास्त का सांगता?, तुमच्याकडे एवढे सोने आले कुठून? असे प्रश्न विचारून पोलिसांनी आपल्याला वेठीस धरल्याचे आणि मानसिक त्रास दिल्याचे त्यांनी रास्तारोको आंदोलना दरम्यान सांगितले.

यावेळी नान्नजचे माजी सरपंच संतोष पवार यांनी पोलीस प्रशासनाच्या कारभारावर जोरदार हल्लाबोल केला. घडलेली घटना अत्यंत गंभीर स्वरूपाची असतानाही दरोड्याचे योग्य कलम लावले गेले नाही. पीडित महिलेवर पोलीस ठाण्यात दबाव आणून चुकीची माहिती नोंदवण्यास भाग पाडले गेले. घटनेच्या दिवशी दुपारी चार ते सहा वाजेपर्यंत पोलीस ठाण्यात एकही वरिष्ठ अधिकारी उपस्थित नव्हता. यावरून पोलिसांना या दरोड्याचे गांभीर्य नसल्याचे दिसून येते, ज्यामुळे या गुन्ह्यात पोलिसांचे तर साटेलोटे नाही ना? असा सवालही संतोष पवार यांनी आंदोलनादरम्यान उपस्थित केला.

**■ तीन तास चाललेल्या या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच पोलीस दल घटनास्थळी दाखल झाले. सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित मोरे यांनी आंदोलकांशी आणि पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, फिर्यादी आणि ग्रामस्थांच्या मागण्यांबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.**

पोलिसांच्या वतीने आंदोलकांना लेखी आश्वासन देण्यात आले असून, सदर गुन्ह्याचा तपास मी स्वतः करत आहे. सर्व आरोपींचा लवकरात लवकर शोध घेऊन त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. पोलिसांच्या या लेखी आश्वासनानंतर ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले. या वेळी नान्नज व्यापारी असोसिएशन व नान्नज ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हॉकीत भारताचा 'डबल' विजय

## मलेशियाचा ५-१ असा धुव्वा उडवत २०२८ ऑलिम्पिकचे तिकीट

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुरुष संघालाही सुवर्ण पदक**

**नवी दिल्ली :** आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय हॉकीने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले. भारतीय पुरुष हॉकी संघाने शनिवारी मलेशियाचा ५-१ असा दणदणीत पराभव करत सुवर्णपदकावर नाव कोरले. या विजयासह भारताने आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुष हॉकीचे सुवर्णपदक सलग दुसऱ्यांदा जिंकत इतिहास रचला. हे भारताचे आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुष हॉकीमधील पाचवे सुवर्णपदक ठरले. या कामगिरीमुळे भारतीय संघाने लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकसाठी थेट पात्रता मिळवली आहे.

हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने अंतिम सामन्यात सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला. ११व्या मिनिटाला हरमनप्रीतने पेनल्टी कॉर्नरवर गोल करत भारताचे खाते उघडले. मलेशियाने लगेच प्रत्युत्तर देत सामना १-१ असा बरोबरीत आणला. मात्र भारताने दुसऱ्या क्वार्टरमध्ये पुन्हा आघाडी घेतली. २३व्या मिनिटाला जुगराज सिंगने पेनल्टी कॉर्नरचे रूपांतर गोलमध्ये केले.

उत्तरार्धात भारतीय खेळाडूंनी सामन्यावर पूर्णपणे पकड मिळवली. ४२व्या मिनिटाला उपकर्णधार हार्दिक सिंगने पेनल्टी स्ट्रोकवर गोल करत भारताची आघाडी ३-१ केली. त्यानंतर शिलानंद लकडाने ५४व्या मिनिटाला मैदानी गोल करत मलेशियाच्या अडचणी वाढवल्या. अखेर ५७व्या मिनिटाला हरमनप्रीतने पुन्हा पेनल्टी कॉर्नरवर गोल करत भारताचा विजय ५-१ असा निश्चित केला.

या विजयाचे आणखी एक ऐतिहासिक वैशिष्ट्य म्हणजे भारतीय पुरुष संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेतील हॉकीचे सुवर्णपदक प्रथमच सलग दोन पर्वांत राखले आहे. यापूर्वी भारताने **(पान ४ वर)**

# हिमतलाव फुटले तर बिहार-यूपीत पूर!

## नेपाळची ४१५ कोटींची मोहीम १८ हजार फूट उंचीवर चार तलावांतील पाणी कमी करणार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**काठमांडू :** हिमालयातील वेगाने वितळणाऱ्या हिमनद्यांमुळे निर्माण झालेल्या चार धोकादायक हिम तलावांचा धोका कमी करण्यासाठी नेपाळने सुमारे ४१५ कोटी रुपयांची महत्त्वाकांक्षी मोहीम हाती घेण्याची तयारी केली आहे. या तलावांमधील पाण्याची पातळी नियंत्रित पद्धतीने कमी केली जाणार असून, संभाव्य हिमतलाव फुटीमुळे नेपाळसह भारताच्या बिहार आणि उत्तर प्रदेशातील काही भागांना निर्माण होणारा पुराचा धोका कमी करण्याच्या दृष्टीनेही ही मोहीम महत्त्वाची ठरणार आहे.

जागतिक तापमानवाढीमुळे हिमालयातील हिमनद्या वेगाने वितळत आहेत. त्यातून उंच पर्वतीय भागांत मोठे हिमतलाव तयार होत असून, या तलावांचे पाणी माती, दगड आणि बर्फाच्या नैसर्गिक बांधांमुळे अडवले जाते. भूकंप, हिमस्खलन किंवा अतिवृष्टीमुळे हे नैसर्गिक बांध फुटल्यास प्रचंड वेगाने पाण्याचा लोंढा खालच्या भागात येतो. या घटनेला हिमतलाव फुटीचा पूर (जीएलओएफ) म्हटले जाते. अशा पुरामुळे गावे, रस्ते, पूल, जलविद्युत प्रकल्पांसह मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांचे नुकसान होऊ शकते.नेपाळमधील मध्य आणि पूर्व हिमालयीन भागातील ठुलागी, लोअर बारुण, लुमडिंग त्शो आणि होंगू-२ या चार हिमतलावांना संभाव्य धोकादायक तलाव म्हणून ओळखण्यात आले आहे. हे तलाव समुद्रसपाटीपासून सुमारे १३ हजार २८० ते १८ हजार फूट उंचीवर आहेत. २०२० मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम आणि इंटरनॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड माउंटन डेव्हलपमेंटच्या अहवालातही या तलावांमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्याचा उल्लेख करण्यात आला होता.या पार्श्वभूमीवर तलावांमधील पाणी नियंत्रित पद्धतीने कमी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. प्रकल्पासाठी ग्रीन क्लायमेट फंड, संयुक्त राष्ट्र आणि नेपाळ सरकारकडून निधी उभारला जाणार असून, संपूर्ण मोहीम पूर्ण होण्यासाठी सुमारे सहा वर्षांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. नेपाळच्या सीमापलीकडेही या मोहिमेचा परिणाम जाणवणार आहे. हिमतलाव फुटल्यास त्यातून निर्माण होणाऱ्या पुराचा प्रवाह भारताच्या दिशेने येऊ शकत असल्याने बिहार आणि उत्तर प्रदेशातील नदीकाठच्या भागांसाठी संभाव्य धोका कमी करण्याच्या दृष्टीने या प्रकल्पाकडे लक्ष लागले आहे.



### १८ हजार फूट उंचीवर जीवघेणे आव्हान

या मोहिमेचे सर्वांत मोठे आव्हान म्हणजे अत्यंत प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती. सुमारे १८ हजार फूट उंचीवर ऑक्सिजनचे प्रमाण कमी असल्याने अभियंते आणि कामगारांना श्वसनाचा त्रास, थकवा आणि अन्य अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यात कडाक्याची थंडी, हिमस्खलन, अचानक बदलणारे हवामान आणि अनपेक्षित पुराचा धोका कायम राहणार आहे. दुर्गम पर्वतीय भागात मोठी यंत्रसामग्री आणि बांधकाम साहित्य पोहोचवणेही आव्हानात्मक ठरणार आहे. त्यामुळे पाण्याची पातळी कमी करण्याची प्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक आणि टप्प्याटप्प्याने राबवावी लागणार आहे.

# सहलीचा आनंद, पालकांच्या आयुष्यभराचा आक्रोश!

## दिवेआगरच्या समुद्रातील आठ विद्यार्थ्यांचा बळी; सहली नव्हे, तर सुरक्षिततेची जबाबदारी महत्त्वाची

सहलीला जाताना मुलांच्या चेहऱ्यावर असलेला आनंद, डोळ्यांत असलेली उत्सुकता आणि घरी परतण्याची वाट पाहणाऱ्या आई-वडिलांची आतुरता... या सगळ्याचा एका क्षणात चुराडा व्हावा आणि ज्या मुलांच्या हसऱ्या चेहऱ्यांनी घर सोडले, त्यांची निःशब्द पार्थिवे घरी परतावीत, यापेक्षा पालकांसाठी मोठा आघात कोणता असू शकतो? दिवेआगरच्या समुद्रात आठ विद्यार्थ्यांचा बुडून झालेला दुर्दैवी मृत्यू ही केवळ एक दुर्घटना नाही; ती आपल्या विद्यार्थी सहलींच्या सुरक्षिततेवर आणि व्यवस्थेच्या संवेदनशीलतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी शोकांतिका आहे.

आळंदीतील खासगी क्लासच्या सहलीत ४२ विद्यार्थी आणि सहा शिक्षक सहभागी झाले होते. समुद्रात उतरलेल्या आठ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी अंत झाला. प्राथमिक माहितीनुसार पाण्याची खोली, भरती आणि समुद्रातील प्रवाहाचा अंदाज चुकल्याने ही दुर्घटना घडली. मात्र, 'अंदाज चुकला' एवढे कारण देऊन या दुर्घटनेची जबाबदारी संपणार नाही. कारण अल्पवयीन विद्यार्थ्यांकडून समुद्राच्या धोक्याचे अचूक आकलन अपेक्षितच कसे करता येईल? त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी सोबत असलेल्या प्रौढांची, आयोजकांची आणि संबंधित व्यवस्थेची असते.

दिवेआगरची ही घटना महाराष्ट्रासाठी नवी नाही. यापूर्वीही समुद्रकिनारी, धरणांवर, नदीपात्रात, धबधब्यांवर आणि गड-किल्ल्यांवर सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना जीव गमवावा लागला आहे. प्रत्येक वेळी दुर्घटना घडते, शोक व्यक्त केला जातो, चौकशीचे आदेश दिले जातात, खबरदारीचे आवाहन केले जाते आणि काही दिवसांनी सगळे पुन्हा पूर्वपदावर येते. मृतांची संख्या लक्षात राहते; पण दुर्घटनेनंतर बदललेली सुरक्षा व्यवस्था किती काळ टिकते, हा प्रश्न मात्र अनुत्तरित राहतो.




सहली बंद करणे हा यावरील उपाय निश्चितच नाही. वर्गाच्या चार भिंतीबाहेरचे शिक्षण विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक आहे. निसर्गाचा अनुभव, ऐतिहासिक स्थळांची माहिती, सामूहिक जीवनाचा अनुभव आणि सहकाऱ्यांसोबत शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळालीच पाहिजे. पण सहल म्हणजे केवळ मनोरंजन नाही; ती विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची मोठी सामूहिक जबाबदारी आहे.

विशेषतः समुद्र, नदी, धरण, तलाव किंवा धबधबा असलेल्या ठिकाणी सहलीचे नियोजन करताना केवळ पर्यटनस्थळ म्हणून विचार करून चालणार नाही. त्या ठिकाणची भौगोलिक परिस्थिती, पाण्याची खोली, भरती-ओहोटी, प्रवाह, हवामान, स्थानिक प्रशासनाच्या सूचना आणि आपत्कालीन बचावव्यवस्था यांचा आधीच अभ्यास झाला पाहिजे. विद्यार्थ्यांना पाण्यात उतरण्याची परवानगी देताना तर सुरक्षिततेचे कठोर निकष असलेच पाहिजेत.

पोहता येणे आणि समुद्रात सुरक्षित राहणे या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत. समुद्रातील प्रवाहाची ताकद, अचानक बदलणारी परिस्थिती आणि भरतीचा वेग याचा अनुभव नसलेल्या विद्यार्थ्यांना केवळ त्यांच्या आत्मविश्वासावर पाण्यात उतरू देणे धोकादायक आहे.

म्हणूनच राज्य सरकारने शाळा, महाविद्यालये, खासगी क्लासेस आणि विद्यार्थी सहली आयोजित करणाऱ्या प्रत्येक संस्थेसाठी एकसंध आणि बंधनकारक सुरक्षा नियमावली तयार करण्याची गरज आहे. सहलीपूर्वी ठिकाणाची जोखीम तपासणी, स्थानिक प्रशासनाशी समन्वय, पुरेसे प्रशिक्षित पर्यवेक्षक, विद्यार्थ्यांची गटवारी, आपत्कालीन संपर्क व्यवस्था आणि आवश्यक बचावसाधनांची उपलब्धता अनिवार्य केली पाहिजे. जलस्रोतांच्या परिसरात प्रशिक्षित जीवरक्षक आणि सुरक्षित क्षेत्र निश्चित नसल्यास विद्यार्थ्यांना पाण्यात उतरण्यास पूर्ण बंदी असावी.

किनाऱ्यावर फलक लावून किंवा धोक्याच्या ठिकाणी दोरी बांधून प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. जीवरक्षकांची उपलब्धता, तत्पर बचाव पथक, आपत्कालीन वैद्यकीय सुविधा आणि स्थानिक यंत्रणेशी समन्वय या बाबी प्रत्यक्षात कार्यरत असणे आवश्यक आहे.

या दुर्घटनेत आणखी एक दुर्लक्षित पैलू आहे, जिवंत राहिलेल्या विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य. त्यांनी आपल्या मित्रांना गमावले आहे. त्यांनी पाहिलेला प्रसंग त्यांच्या मनावर खोल परिणाम करू शकतो. त्यामुळे त्यांना केवळ घरी पाठवणे पुरेसे नाही; त्यांच्यासाठी समुपदेशन आणि मानसिक आधाराची व्यवस्था करणेही तितकेच आवश्यक आहे.

चौकशीही केवळ कागदोपत्री नको. दुर्घटनेपूर्वी कोणते नियोजन झाले होते? विद्यार्थ्यांना पाण्यात उतरण्याची परवानगी कोणी दिली? किती पर्यवेक्षक होते? स्थानिक प्रशासनाच्या सूचना काय होत्या? सुरक्षिततेची कोणती साधने उपलब्ध होती? या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर शोधले गेले पाहिजे. निष्काळजीपणा आढळल्यास जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई झाली पाहिजे.

आठ कुटुंबांचे आयुष्य या घटनेने उद्ध्वस्त झाले आहे. त्यांचे दुःख कोणतीही भरपाई कमी करू शकणार नाही. त्यांच्या घरातील एका खोलीत आता कायमची शांतता असेल. आई-वडिलांच्या डोळ्यांसमोर मुलांचे चेहरे आणि त्यांच्या आठवणी असतील. म्हणूनच या आठ मृत्यूंकडे केवळ 'दुर्दैवी दुर्घटना' म्हणून पाहणे ही या शोकांतिकेची दुसरी शोकांतिका ठरेल.

सहल संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी घरी परतावे, त्यांच्या पालकांनी दारात उभे राहून त्यांचे हसरे चेहरे पाहावेत आणि 'सगळे सुखरूप आले' म्हणून सुटकेचा निःश्वास सोडावा, यापेक्षा सहलीच्या यशाचे दुसरे कोणतेही मोजमाप असू शकत नाही.

दिवेआगरच्या समुद्राने आठ निष्पाप जीव गिळले आहेत. त्यांच्या स्मृतीला खरी श्रद्धांजली म्हणजे केवळ शोक व्यक्त करणे नव्हे; तर भविष्यातील एका तरी मुलाचा जीव वाचवणारी व्यवस्था उभी करणे होय. आता तरी समुद्राच्या या आक्रोशातून सरकार, प्रशासन, शिक्षणसंस्था आणि समाजाने धडा घ्यावा. कारण आई-वडिलांनी मुलाला सहलीला पाठवताना त्याच्याकडून परत येण्याचे आश्वासन मागितलेले नसते, ते फक्त त्याच्या सुरक्षित परतीवर विश्वास ठेवत असतात. हा विश्वास तुटता कामा नये.

# साई संस्थान हॉस्पिटलच्या नर्स भरतीबाबत खोडसाळ




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** साईबाबा संस्थान च्या हॉस्पीटल मध्ये नर्सिंग भरतीबाबत बनावट आणि दिशाभूल करणारा संदेश वेगाने व्हायरल होत असून या संदेशात आणि स्टाफ नर्स पदांच्या भरतीची खोटी माहिती पसरवली जात असून अशा प्रकारची कोणतीही कामगार भरती संस्थान करत नसून त्या व्हायरल मेसेज वर कुणी विश्वास ठेवू नये असा इशारा संस्थानने दिला आहे .

सध्या सोशल मीडियावर फिरत असलेला भरतीचा संदेश पूर्णपणे खोटा व अनधिकृत आहे. श्री साईबाबा संस्थान हॉस्पिटलच्या वतीने सध्या कोणतीही अशी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांनी आणि नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांनी अशा अफवांवर मुळीच विश्वास ठेवू नये. संस्थानच्या वतीने कोणतीही अधिकृत भरती किंवा जाहिरात केवळ त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा अधिकृत माध्यमांद्वारेच प्रसिद्ध केली जाते.

अशा अनधिकृत संदेशांमध्ये दिलेल्या संपर्क क्रमांकांवर कोणतीही वैयक्तिक माहिती शेअर करू नका किंवा कोणत्याही स्वरूपाचा आर्थिक व्यवहार (पैशांची देवाणघेवाण) करू नका.

फसव्या जाहिरातींपासून सावध राहण्याचे आवाहन संस्थान प्रशासनाकडून करण्यात आले आहे .

# राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या क्रीडा स्पर्धांना लोणीत उत्साहात प्रारंभ




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** जीवनात खेळाला अनन्यसाधारण महत्त्व असून, खेळामुळे शारीरिक आरोग्यासोबतच मनातील उर्मी आणि ऊर्जा सकारात्मक पद्धतीने व्यक्त होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी क्रीडा कौशल्यासोबत संघभावना, संयम आणि परिश्रमाची कास धरावी. डॉक्टरांनी स्वतःचे आरोग्य जपले, तरच ते समाजातील इतरांच्या आरोग्याची प्रभावीपणे सेवा करू शकतील. संघभावनेने व सातत्यपूर्ण परिश्रमाने यश निश्चित मिळते, असे प्रतिपादन श्री साईबाबा संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांनी केले.

प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, लोणी या प्रवरा अभिमत विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय स्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयांच्या क्रीडा स्पर्धांच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रवरा अभिमत विद्यापीठाचे विश्वस्त ध्रुव विखे पाटील, कुलगुरू डॉ. व्ही. एन. मगरे, अधिष्ठाता डॉ. सतीश महाजन, कुलसचिव डॉ. रवींद्र लावरे, क्रीडा संचालक डॉ. सुनील बुलार, क्रीडा शिक्षक नितीन गोर्डे आदी उपस्थित होते. दराडे म्हणाले, प्रवरा परिसराला सहकाराचा समृद्ध वारसा लाभला आहे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील व पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या दूरदृष्टीतून सहकाराच्या माध्यमातून परिसराचा कायापालट झाला. शिक्षण, आरोग्य व सामाजिक विकासाच्या क्षेत्रात प्रवरेचे योगदान उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी प्रवरा परिसरातील आरोग्यसेवा महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित झाले आहे.

यानंतर दराडे यांनी स्पर्धांच्या उद्घाटनाची घोषणा केली. विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील ३५ संघ आणि सुमारे ४०० खेळाडू सहभागी झाले आहेत. त्यामुळे परिसरात क्रीडा उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सूत्रसंचालन दिपेश खाबीया यांनी केले, तर रीया छल्लानी यांनी आभार मानले.

# बंधारे भरण्यासाठी धरणातून आवर्तन सुरु

## आ. विठ्ठलराव लंघे यांच्या पाठपुराव्याला यश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** दुष्काळी परिस्थितीमुळे नेवासा तालुक्यातील मुळा नदीकाठच्या गावांमध्ये निर्माण झालेली पाणीटंचाई दूर करण्यासाठी मुळा धरणातून आवर्तन सोडण्यात आले आहे. मुळा नदीवरील बंधारे पूर्ण क्षमतेने भरून देण्याच्या मागणीसाठी आमदार विठ्ठलराव लंघे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली आहे. मुळा धरणातून काल सकाळी २ हजार ५०० क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात आले. त्यामुळे मुळा नदीकाठच्या शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. नेवासा तालुक्यात यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने पाणीसाठे झपाट्याने कमी होत आहेत. मुळा नदीकाठची सुमारे २० ते २५ गावे बंधाऱ्यांवर अवलंबून असल्याने या गावांसाठी बंधारे भरणे अत्यावश्यक असल्याचे आमदार लंघे यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. २४ सप्टेंबर रोजी नेवासा फाटा येथील मंगल कार्यालयात पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली टंचाई आढावा बैठक झाली. या बैठकीत आमदार लंघे यांनी तालुक्यातील पाणीटंचाईची परिस्थिती सविस्तर मांडत मुळा नदीवरील बंधारे भरण्याची मागणी केली. खेडले परमानंद, शिरेगाव, पानेगाव, करजगाव, निभारी, अमळनेर आदी गावांतील शेतकऱ्यांनीही बंधारे पूर्ण क्षमतेने भरून देण्याची मागणी केली. शेती, जनावरे, पशु-पक्षी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी बंधाऱ्यांमध्ये पाणीसाठा असणे गरजेचे असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. शिरेगावचे माजी सरपंच किरण जाधव यांनीही पाणीटंचाईची तीव्रता पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर आमदार लंघे यांच्या आग्रही मागणीनंतर मुळा धरणातून आवर्तन सोडण्याचे आश्वासन पालकमंत्र्यांनी दिले होते. दरम्यान, पानेगावचे प्रगतशील शेतकरी विजुभाऊ जगले यांनी बंधाऱ्यांच्या पाणीपट्टीचा मुद्दा उपस्थित केला. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन पाणीपट्टी माफ करण्याची मागणी करण्यात आली. त्यावर पालकमंत्री विखे-पाटील यांनी पाणीपट्टी पूर्णपणे माफ करण्याचे आदेश दिले. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. आवर्तन सुरू झाल्यानंतर मुळा नदीकाठच्या गावांतील शेतकऱ्यांनी आमदार लंघे आणि पालकमंत्री विखे-पाटील यांचे आभार मानले. या निर्णयामुळे परिसरातील शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही काही प्रमाणात सुटण्यास मदत होणार आहे. बैठक आणि पाठपुराव्यामुळे मागणीला यश मिळाल्याने शेतकरी वर्गात उत्साहाचे वातावरण आहे.

# श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात मराठी भाषा दिन उत्साहात



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा:** येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. अरुण धनवट हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून हरिभक्त परायण संतोष महाराज सुकाळकर उपस्थित होते. त्यांनी संत साहित्यातील मराठी भाषेचे महत्त्व विषद करून युवकांनी मराठी भाषा जतन करण्याची गरज असल्याचे सांगितले.माजी प्राध्यापक अशोक चौधरी यांनी कुसुमाग्रजांच्या कवितांचे दाखले देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. हरिश्चंद्र माने, पर्यवेक्षक प्रा. गोवर्धन रोडे, प्रा. भगवंत वीरकर, प्रा. रामराव काळे, प्रा. देविदास साळुंके, प्रा. उमेश भागवत, प्रा. नितीन खरात, प्रा. ज्योती भोगे, प्रा. सुभाष सोनवणे, प्रा. सुरेश होले , प्रा. किरण कदम , प्रा. कदम निलेश, सुकन्या फाटके आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी पाहुण्यांचा परिचय प्रा.गोवर्धन रोडे यांनी करून दिला प्रास्ताविक प्रा. ज्योती भोगे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. देविदास साळुंके यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रा. हरिश्चंद्र माने यांनी मानले.

# रायफल शूटिंग स्पर्धेत उन्नती वर्पे जिल्ह्यात प्रथम



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर:** १९ वर्ष वयोगटातील पिपसाईट एयर रायफल शूटिंग जिल्हास्तरीय स्पर्धेत उन्नती संजय वर्पे हिने प्रथम क्रमांकासह गोल्ड मेडल प्राप्त केले आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर आणि त्रिमूर्ती शैक्षणिक व क्रीडा संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या १९ वर्षे वयोगटातील पिपसाइट एअर रायफल शूटिंग स्पर्धा नुकत्याच त्रिमूर्ती क्रीडा संकुल, नेवासा फाटा येथे संपन्न झाल्या.

या स्पर्धेत प्रवरानगर येथील महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावी विज्ञान वर्गातील विद्यार्थिनी कु.उन्नती संजय वर्पे हिने उत्कृष्ट नेमबाजी करून जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. तिची विभागीय स्पर्धे साठी निवड झाली आहे.

तिच्या या यशाबद्दल जनरल बॉडी सदस्य रावसाहेब म्हस्के, उपाध्यक्ष अरुण कडू, जनरल बॉडी सदस्य एकनाथराव घोगरे, जनरल बॉडी सदस्य माजी प्राचार्य भिमराव आंधळे, प्राचार्य दिलीप डहाळे, मुख्याध्यापिका नलिनी जाधव, प्र.उपप्राचार्य संजय डुबे, पर्यवेक्षिका संगीता सांगळे, देवेश आहेर, डॉ. शरद दुधाट, माधुरी वडघुले, संजय ठाकरे, विलास गभाले, नरेंद्र ठाकरे, बाबासाहेब अंत्रे यांच्यासह सर्व शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे. तिला क्रीडाशिक्षक शिवप्रसाद जंगम यांचे मार्गदर्शन लाभले.

# दुष्काळात सोयाबीनने रडवले; बाजरीने शेतकऱ्यांना हसवले




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा,:** अनियमित पावसामुळे सोयाबीन पिकाला मोठा फटका बसला असताना, कमी पाण्यातही बाजरीचे पीक चांगले आले आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीत बाजरीने शेतकऱ्यांना दिलासा दिल्याचे प्रतिपादन कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे यांनी केले. नेवासा तालुक्यातील बकुपिंपळगाव शिवारात 'शास्त्रज्ञ भेट' उपक्रमांतर्गत बाजरी पिकाची पाहणी करण्यात आली. यावेळी डॉ. ढगे व सहाय्यक कृषी अधिकारी दिगंबर लोखंडे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. डॉ. ढगे म्हणाले, जूनमध्ये पाऊस अत्यल्प झाला. त्यानंतर जुलैमध्ये अरबी समुद्र व बंगालच्या उपसागरात एकाच वेळी कमी दाबाचे पट्टे निर्माण झाल्याने चांगला पाऊस झाला. मात्र, ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये पावसाने दडी मारल्याने खरीप पिकांवर परिणाम झाला. अशा परिस्थितीत हवामानाचा अंदाज आणि शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन लक्षात घेऊन पीक रचनेत बदल करणे आवश्यक आहे. लातूर, धाराशिवसह इतर जिल्ह्यांत सोयाबीनऐवजी बाजरीची लागवड केली असती तर शेतकऱ्यांना फायदा झाला असता, असे त्यांनी सांगितले.

सहाय्यक कृषी अधिकारी कीर्ती सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली बकुपिंपळगाव परिसरात बाजरीचे पीक चांगले उभे राहिले असून, एका पाण्यावरही पीक जोमदार असल्याचे दिसून आले. दादा बाचकर, शरद बाचकर, लखन मिसाळ व एकनाथ मिसाळ यांच्या शेतातील पिकाची पाहणी करण्यात आली. पुढील खरीप हंगामातही हवामानातील बदलांचा विचार करून पीक रचनेचे नियोजन करावे, असा सल्ला डॉ. ढगे यांनी दिला.

# पालकमंत्री व आ. काळे शेतकऱ्यांच्या बांधावर



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :-** पावसाअभावी पिके जळून खाक होत असल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी आमदार आशुतोष काळे यांच्या समवेत कोपरगाव मतदारसंघातील चांदेकसारे येथे थेट शेताच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. यावेळी घाबरू नका, महायुती शासन आणि आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे आहोत अशा शब्दांत पालकमंत्र्यांनी शेतकऱ्यांना धीर दिला.

कोपरगाव तालुक्यात पावसाने ओढ दिल्यामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांवर निर्माण झालेल्या या संकटाची दखल घेत आमदार आशुतोष काळे यांनी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा करून कोपरगाव मतदार संघ दुष्काळग्रस्त जाहीर करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या या पाठपुराव्याला यश मिळून कोपरगाव मतदार संघ दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आला आहे.त्या पार्श्वभूमीवर कोपरगाव मतदार संघातील दुष्काळ परिस्थितीची दाहकता जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी स्वत: पालकमंत्र्यांच्या वाहनाचे सारथ्य करत त्यांना थेट मतदार संघातील चांदेकसारे येथे शेतकऱ्यांच्या बांधावर घेवून गेले व परिस्थिती निदर्शनास आणून दिली.पावसाअभावी करपलेली पिके, शेतकऱ्यांचे झालेले नुकसान आणि शेतकऱ्यांच्या अडचणी पालकमंत्र्यांनी प्रत्यक्ष जाणून घेतल्या. यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या समस्या आणि नुकसानीची माहिती पालकमंत्र्यांना दिली.

शेतकऱ्यांशी संवाद साधताना पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी घाबरू नका, महायुती शासन आणि आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. या संकटाच्या काळात शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी शासन सकारात्मकपणे प्रयत्न करेल असा विश्वास दिला.आमदार आशुतोष काळे म्हणाले, शेतकऱ्यांनी या कठीण परिस्थितीत घाबरून जाऊ नये; शासनाचा प्रतिनिधी म्हणून मी तुमच्या प्रत्येक अडचणीत ठामपणे तुमच्या पाठीशी उभा आहे. कोपरगाव तालुका दुष्काळग्रस्त जाहीर झाल्यानंतर शासनाच्या मदतीचा लाभ प्रत्येक शेतकऱ्याला मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचा शिर्डी विश्रामगृह ते कोपरगाव असा नियोजित दौरा होता. मात्र, कोपरगाव मतदार संघातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आ. काळे यांनी शिर्डी विश्रामगृह गाठले. शेतकऱ्यांची परिस्थिती प्रत्यक्ष पाहणे गरजेचे आहे. आपण अधिकाऱ्यांसमवेत शेतकऱ्यांच्या बांधावर गेल्यास नुकसानीची वस्तुस्थिती प्रशासनाच्या निदर्शनास येईल आणि पंचनामे व पुढील मदतीची कार्यवाही अधिक प्रभावीपणे करता येईल असा आग्रह धरला. शेतकऱ्यांप्रती आ. काळे यांची तळमळ आणि परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पालकमंत्री ना. विखे पाटील यांनी तत्काळ त्यांच्या आग्रहाला सहमती दिली. यावेळी आ. काळे यांनी स्वतः ना. विखे पाटील यांची गाडी चालवत त्यांना थेट दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर घेवून जाऊन नुकसानीची पाहणी केली.

# जेजुरीच्या मुख्य पुजाऱ्यांचे म्हाळसा खंडोबाचे दर्शन




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** भक्तीचा सुगंध, श्रद्धेचा वारसा आणि प्रवरा नदीच्या निसर्गरम्य तीरावर वसलेले ऐतिहासिक देवस्थान अशा आध्यात्मिक वातावरणाने समृद्ध असलेल्या नेवासा बुद्रुक येथील पुरातन श्री म्हाळसा खंडोबा बाणाई मंदिरास जेजुरी येथील श्री मार्तंड खंडोबा मंदिराचे मुख्य पुजारी निलेश बारभाई यांनी सपत्नीक भेट देऊन दर्शन घेतले. या पवित्र क्षेत्राचे धार्मिक महत्त्व, म्हाळसादेवीचा महिमा आणि नदीकाठचा निसर्गरम्य परिसर पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

नेवासा बुद्रुक येथील प्रवरा नदीच्या काठावर श्री म्हाळसादेवी, खंडोबा व बाणाई यांचे पुरातन मंदिर आहे. या प्राचीन मंदिराशेजारीच श्री खंडोबा व म्हाळसादेवीचे नूतन मंदिर उभारण्यात आले आहे. निलेश बारभाई यांनी या दोन्ही मंदिरांना भेट देऊन दर्शन घेतले. या क्षेत्राची धार्मिक परंपरा, ऐतिहासिक महत्त्व आणि निसर्गरम्य वातावरण अनुभवताना त्यांनी आनंद व्यक्त केला.

नेवासा हे खंडोबादेवाचे सासर, तर आदिमाया शक्ती म्हाळसादेवीचे माहेरघर म्हणून या क्षेत्राला विशेष धार्मिक महत्त्व आहे. या पवित्र स्थानाची महती केवळ स्थानिक भाविकांपुरती मर्यादित न राहता राज्यभरातील भाविकांपर्यंत पोहोचावी, अशी अपेक्षा निलेश बारभाई यांनी व्यक्त केली.

या भेटीप्रसंगी निलेश बारभाई व अ‍ॅड. सौ. स्वाती बारभाई यांचा पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई मंदिर जीर्णोद्धार समितीचे प्रमुख संभाजीराव ठाणगे, राजेंद्र काशीद, बालू फसले व शांताराम बोर्डे यांच्या वतीने पिवळे वस्त्र देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी पुणे येथील धनकवडीचे विठ्ठल चव्हाण, देवस्थानचे प्रसिद्धीप्रमुख तथा पत्रकार सुधीर चव्हाण, अक्षय ठोंबरे व प्रसाद रहाट,सचिन चांदणे उपस्थित होते.प्राचीन धार्मिक परंपरा, निसर्गरम्य परिसर आणि खंडोबा-म्हाळसादेवीच्या भक्तीभावाने समृद्ध असलेले नेवासा बुद्रुकचे हे देवस्थान भाविकांसाठी श्रद्धेचे महत्त्वपूर्ण केंद्र ठरत आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## प्रवीण कोल्हें यांच्याकडे पुणे जल संपदासह सोलापूरचा ही अतिरिक्त कार्यभार



**संगमनेर** : महाराष्ट्र जलसंपदा शासनाच्या विभागाच्या आदेशानुसार मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, सोलापूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुणे पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रवीण शिवाजी कोल्हे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. कोल्हे यांनी मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, सोलापूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला. संगमनेर तालुक्यातील जोर्वे येथील रहिवासी असणारे शिवाजी कोल्हे यांचे सुपुत्र प्रवीण कोल्हे हे सध्या पुणे येथे जलसंपदाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत आहे कोल्हे यांनी जलसंपदा विभागातील विविध सिंचन प्रकल्पाच्या बांधकामासह सिंचन व्यवस्थापनाचा प्रदीर्घ अनुभव आहे. या अनुभवाचा उपयोग विशेष प्रकल्पाचे नियोजन अंमलबजावणी होणार आहे. सोलापूर येथील मुख्य अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारल्याने त्यांच्या प्रशासकीय जबाबदारीतही वाढ झाली आहे. तसेच जलसंपदा विभागांतर्गत सुरू असलेल्या विविध विशेष प्रकल्पांच्या कामांना गती देण्यासह प्रकल्पांच्या प्रशासकीय व तांत्रिक बाबींच्या समन्वयाची जबाबदारी त्यांच्यावर राहणार आहे.

## राजापूरची मानसी हासे नीट परीक्षेत तालुक्यात प्रथम



**संगमनेर** : तालुक्यातील राजापूर येथील मानसी तुळशीराम हासे हिने अभ्यासात सातत्य ठेवत तसेच कोणत्याही परिस्थितीत डॉक्टर व्हायचंच ही जिद्द मनाशी बाळगून वैद्यकीय प्रवेश पात्रतेसाठी असलेल्या नीट परीक्षेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला असून तिची नासिक येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एम बी बी एस या अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. पुणे येथे भारतीय सैन्य दलामध्ये सुभेदार या पदावर कार्यरत असणारे तुळशीराम हासे यांची कन्या मानसी हिने वैद्यकीय प्रवेश पात्रतेसाठी आवश्यक असलेली नीट परीक्षा दिली. या नीट परीक्षेतील ऑल इंडिया रँक मध्ये खुल्या गटातून ९७ हजार ७१५ वा क्रमांक पटकावत संगमनेर तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला मानसी हिच्या यशाचे कौतुक करत आ. अमोल खताळ यांनी तिचा सन्मान केला.

## दुष्काळी परिस्थिती पंचनाम्यासाठी प्रशासन शेतकऱ्यांच्या बांधावर



**झरेकाठी** : यावर्षी मान्सून पावसाने चांगलीच ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. शासनाकडून दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून उपाययोजना सुरू करण्यात आल्या असून या पार्श्वभूमीवर संगमनेर तालुक्यातील कनोली व शेजारील पिंपरणे परिसरात शेतकऱ्यांच्या पिक नुकसानीच्या पंचनाम्यांस प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. सहाय्यक कृषि अधिकारी संकेत पाडळे , ग्रामपंचायत अधिकारी ज्योती सातपुते या सह शेतकरी , यांनी कपाशी, बाजरी, मका आदी पिकांची स्थिती आणि झालेल्या नुकसानीची नोंद घेतली. कृषी,महसूल व ग्रामविकास विभागाच्या पथकाने शेतशिवारात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी उपस्थित परिसरातील शेतकऱ्यांसोबत चर्चा करून कोणत्या पिकाचे किती क्षेत्र बाधित आहे, पिकांची सद्यस्थिती काय आहे? नुकसानीचे प्रमाण किती आहे? याबाबत सविस्तर माहिती संकलित करण्यात येत असून ही नोंद शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या निकषांनुसार करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

## मुठेवाडगांव शिवारात मोटारसायकलवर बिबट्याची झडप



**माळवाडगांव** : आज शुक्रवारी रात्री ९.३० च्या दरम्यान मोटारसायकलवरून वस्तीवरील घराकडे जातांना मांजर आडवं आलं समजुन मोटारसायकलचा वेग कमी करताच पाठिमागून बिबट्याने झडप घातल्याने बिबट्याचे हल्ल्यात मोटारसायकल स्वार जबर जखमी झाल्याची घटना मुठेवाडगांव शिवारात घडली. मुठेवाडगांव शिवारातील जासुद वस्तीजवळुन माळावर घराकडे मोटारसायकल वरून निघालेले शिवाजी बाळासाहेब कोळपे(वय३०) यांना वाटले मांजर आडवं आलं परंतू तेवढ्यात ते निघाले बिबट्याचे बछडे! हे समजायच्या आत पाठिमागून बिबट्याने झडप घालून गाडीवरून खाली खेचले. जोरात खेचताच कोळपे यांनी जोरात आरडाओरड केल्याने वस्त्यावरील लोक बॅटऱ्या घेऊन रस्त्यावर धावल्याने बिबट्याने धूम ठोकली.परंतू अवघ्या तीन मिनीटाच्या झटापटीत कोळपे यांना जबर जखमी केले. त्यांना तातडीने शिरसगांव ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. प्राथमिक उपचार करून त्यांना अहिल्यानगर येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले.

# ‘माझा परिसर, माझी जबाबदारी’ भावनेतून स्वच्छतेचा संदेश

## शिवाजीराव पवार कॉलेज ऑफ फार्मसीतर्फे नेवासा बसस्थानकात स्वच्छता अभियान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता पंधरवडा अभियानांतर्गत शिवा ट्रस्ट, पाचेगाव संचलित शिवाजीराव पवार कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने नेवासा बसस्थानक परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. महाविद्यालयातील विद्यार्थिनी, प्राध्यापक व मान्यवरांनी बसस्थानक परिसराची स्वच्छता करून नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला. यावेळी मार्गदर्शन करताना नेवासा नगरपंचायतीचे लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील म्हणाले, महात्मा गांधी यांची शिकवण केवळ विचारांपुरती



मर्यादित नव्हती, तर ती कृतीतून दिसून येत होती. दुसऱ्याच्या वेदना समजून घेणे, गरजू व्यक्तीला मदतीचा हात देणे आणि समाजहितासाठी काम करणे हाच खरा मानवधर्म आहे. प्रत्येक नागरिकाने ही मूल्ये दैनंदिन जीवनात अंगीकारली पाहिजेत.

सार्वजनिक स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचीही तितकीच जबाबदारी आहे. घरासोबतच परिसर, रस्ते, सार्वजनिक ठिकाणे आणि बसस्थानक स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. प्लास्टिक कचऱ्यामुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होत असल्याने त्याचा वापर कमी करून कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याबाबत नागरिकांनी जागरूक राहावे, असे आवाहन डॉ. घुले यांनी केले. ‘माझा परिसर, माझी जबाबदारी’ या भावनेतून प्रत्येकाने स्वच्छतेची सवय अंगीकारावी. केवळ अभियानाच्या दिवशी स्वच्छता न करता वर्षभर स्वच्छता राखण्याची सवय लागणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा संदेश कुटुंब आणि समाजापर्यंत पोहोचवावा, असेही त्यांनी सांगितले. यावेळी आंतरराष्ट्रीय खेळाडू आप्पासाहेब ढूस, राष्ट्रीय जल पुरस्कारप्राप्त पत्रकार शिवाजी घाडगे आणि प्राचार्या मेघा साळवे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी बसस्थानक परिसरातील कचरा गोळा करून स्वच्छता केली. या उपक्रमातून स्वच्छता ही केवळ मोहीम न राहता प्रत्येकाची जीवनशैली बनली पाहिजे, असा संदेश देण्यात आला.

## ‘बिल्डिंग प्रवरा’तून विद्यार्थ्यांचा उद्योजकतेकडे प्रवास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**लोणी** : ‘लोकल ते ग्लोबल’, ‘टाकाऊपासून टिकाऊ’, स्वदेशी वस्तूंचा वापर, पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्ती आणि आत्मनिर्भर भारताचा संदेश देत लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या ‘बिल्डिंग प्रवरा’ विद्यार्थी एक्स्पोला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व्यवसायाची जोड देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योजकतेचे धडे देत आहे. जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील आणि प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या संकल्पनेतून, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा एक्स्पो सुरू आहे. विद्यार्थ्यांसह पालक व ग्रामस्थांनी विविध स्टॉलला भेट देत खरेदीला प्रतिसाद दिला.

पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून लाखो रुपयांची उलाढाल झाली. विद्यार्थ्यांनी स्वतः व्यवसायाची निवड करून स्टॉल उभारले असून, उत्पादन निर्मिती, किंमत निश्चिती, ग्राहकांशी संवाद, विपणन, समाजमाध्यमांचा वापर आणि विक्री तंत्राचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी नारळपाणी, दुग्धजन्य प्रक्रिया पदार्थांसह विविध उत्पादनांचे स्टॉल उभारले आहेत. हस्तकला, आयुर्वेदिक औषधे, सौंदर्यप्रसाधने, साबण व उटणे यांनाही ग्राहकांचा प्रतिसाद मिळत आहे. सौरऊर्जेवरील उपकरणे, बॅटरीवर चालणारी वाहने आणि पर्यावरणपूरक वस्तूंच्या माध्यमातून स्वच्छ ऊर्जेचा संदेश देण्यात आला आहे. अंध व मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पणत्या, आकाशकंदील व शोभेच्या वस्तू लक्ष वेधून घेत आहेत. पुस्तक विक्री केंद्रावर एका दिवसात सुमारे ६० ते ७० हजार रुपयांची विक्री झाली. खाद्यपदार्थ, विविध खेळ आणि मनोरंजनाच्या उपक्रमांनाही गर्दी होत आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी एक्स्पोला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भरतेच्या दिशेने पुढे यावे, यासाठी आवश्यक सहकार्य करण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. रविवारपर्यंत सुरू असलेल्या या उपक्रमाला नागरिकांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी केले.

## कंत्राटी सफाई कामगारांना हटवून परप्रांतीयांची भरती; राहुरीत आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी नगरपरिषदेत गेल्या १० ते १५ वर्षांपासून कार्यरत असलेल्या कंत्राटी सफाई कामगारांना कामावरून कमी करून त्यांच्या जागी परराज्यातील कामगारांची नियुक्ती करण्यात आल्याचा आरोप सफाई कामगार संघटनेने केला आहे. कमी केलेल्या कामगारांना तातडीने सेवेत न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा कामगार संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तानसेन बिवाल यांनी दिला.

राहुरी शहरातील स्वच्छता व आरोग्य व्यवस्थेत कंत्राटी सफाई कामगार गेल्या अनेक वर्षांपासून सेवा बजावत आहेत. कामगारांच्या विविध हक्क व मागण्यांबाबत कामगार न्यायालय तसेच सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात संबंधित ठेकेदार व नगरपरिषद प्रशासनाविरोधात प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यातच कामगारांना सेवेतून कमी करण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. स्थानिक कामगारांना कामावरून कमी करून त्यांच्या जागी उत्तर प्रदेश व बिहारमधून कामगार आणून कमी वेतनावर नियुक्त केल्याचा आरोपही करण्यात आला. औद्योगिक विवाद कायदा, १९४७ मधील कलम ३३ नुसार कामगारांना संरक्षण देऊन त्यांना सेवेतून कमी करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

राहुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, संबंधित ठेकेदार आणि सफाई कामगार संघटनेच्या प्रतिनिधींची तातडीने त्रिपक्षीय सलोखा बैठक घेऊन प्रश्नावर तोडगा काढावा, अशी मागणी बिवाल यांनी केली. कायद्याचे उल्लंघन करून कामगारांना कमी करण्याचा प्रयत्न झाल्यास उच्च न्यायालयात दाद मागण्यात येईल. तसेच कमी केलेल्या कामगारांना तातडीने कामावर न घेतल्यास राहुरी शहरात ‘कचरा फेक आंदोलन’ करण्याचा इशारा त्यांनी दिला. यासंदर्भात अहिल्यानगर येथील सहाय्यक कामगार आयुक्तांकडे कायदेशीर तक्रार दाखल करण्यात आली आहे.

यावेळी विशाल पवार, भोला बर्डे, दीपक हिरे, करण हिरे, गणपत बर्डे, राहुल हिरे, राहुल गुंजाळ, करण सोळसे, गंगा तुजारे, आकाश पवार, संदीप सरोदे, अशोक गायकवाड, अनिता वाकचौरे, मंदा सरोदे, बेबी वाकचौरे, भारती अमृत, राधा गुंजाळ, लीला जंगम, माधुरी गुंजाळ यांच्यासह कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्राचार्य डॉ गायकवाड यांची आदर्श प्राचार्य पुरस्कारासाठी निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : रयत शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील विद्यमान प्राचार्य डॉ नानासाहेब गायकवाड यांची रयत शिक्षण संस्थेमार्फत प्रबोधनकार ठाकरे यांच्या नावाने दिला जाणाऱ्या आदर्श प्राचार्य पुरस्कारासाठी निवड करण्यात आहे. प्राचार्य डॉ. गायकवाड यांनी रयत शिक्षण संस्थेच्या अनेक शाखामध्ये काम केले आहे.

त्यांना संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाच्या सहसचिव पदीही काम केले आहे सध्या संस्थेच्या व्यवस्थापन परिषद व कार्यकारी मंडळाचे ते सदस्य आहेत कोपरगाव तालुक्यातील मढी ह्या गावचे रहिवाशी असून त्यांनी संस्था पातळीवर अनेक पदे भूषविली आहे. रयत शिक्षण संस्थेच्या वर्धापन दिना निमित आज सकाळी १० वाजता कर्मवीर समाधी परिसरात आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या निवडीचे प्रा. डॉ. एस आर बखळे, प्रा. बाळासाहेब बावके, प्रा बारगळ, राष्ट्रवादी कांग्रेसचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब चव्हाण, शिवसेना नेते सुहास वहाडणे, नानासाहेब गव्हाणे, आप्पा कांबळे, मोहनराव काळे, संजय ढोकचौळे, भाऊसाहेब बांद्रे, सुनिल शहाणे, प्रा शेख सह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

## शेतीतील यांत्रिकीकरणातून उत्पादन खर्च कमी करण्याचे आवाहन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण आणि रब्बी पीक लागवड तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यक्रम कृषि संशोधन केंद्र, चास येथे आयोजित करण्यात आला. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीअंतर्गत अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी आणि कृषि संशोधन केंद्र, चास यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम झाला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे होते. यावेळी कृषी अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. तुळशीदास बाष्टेवाड, प्रा. महेश पाचारणे, डॉ. संजय भांगरे, डॉ. रविकिरण राठोड, कृषि संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी काशिनाथ गवारी तसेच सहाय्यक कृषि अधिकारी श्रीमती गोसावी उपस्थित होते. डॉ. नलावडे यांनी शेतीमध्ये आधुनिक यंत्रे व अवजारांचा वापर वाढवून उत्पादन खर्च कमी करण्यासोबत उत्पन्न वाढविण्याचे आवाहन केले. मागील ४० ते ५० वर्षांतील शेतीची परिस्थिती आणि सध्याच्या गरजा यातील बदल त्यांनी स्पष्ट केला.

डॉ. बाष्टेवाड यांनी मनुष्यबळाचा अभाव लक्षात घेता शेतीमध्ये यांत्रिकीकरणाशिवाय पर्याय नसल्याचे सांगितले. डॉ. भांगरे, डॉ. राठोड व काशिनाथ गवारी यांनीही शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ट्रॅक्टरचलित बंदिस्त वाफे तयार करण्याच्या अवजाराचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. चास पंचक्रोशीतील शेतकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. पाचारणे यांनी केले, तर आभार डॉ. भांगरे यांनी मानले.

## संगमनेर महाविद्यालयाचे जिल्हास्तरीय युवा महोत्सवात सुयश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, संगमनेर येथे आयोजित करण्यात आलेल्या अहिल्यानगर जिल्हास्तरीय युवक महोत्सव ‘जल्लोष-२०२६’ मध्ये संगमनेर महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे तर याच महाविद्यालयाच्या नाट्य विभागाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहेएकूण १० कला प्रकारामध्ये या महाविद्यालयाच्या कलाकारांची विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवा साठी निवड करण्यात आली आहे अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अरुण गायकवाड यांनी दिली.



युवक महोत्सवामध्ये तब्बल २८ विविध कलाप्रकारांचा समावेश होता. त्यात डॉ. उमेश जगदाळे लिखित व दिग्दर्शितविशेष म्हणजे(एकांकिका) बिदागी (प्रहसन), रील्स मॅनिया (मूकनाट्य),ए आय आलं(पथनाट्य) व एका लग्नातील जेवणाची पंगत (मिमिक्री) या कलाप्रकारांमध्ये महाविद्यालयाने विशेष नैपुण्यासह हे पारितोषिक प्राप्त केले. या व्यतिरिक्त, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शास्त्रीय गायन, शास्त्रीय नृत्य, समूह नृत्य, समूह गायन, सुगम गायन, बासरी वादन, पोस्टर मेकिंग, रांगोळी, प्रश्नमंजुषा, वक्तृत्व, मांडणी कला वादविवाद, स्पॉट फोटोग्राफी या कला प्रकारांसह एकूण २८ स्पर्धा प्रकारांमध्ये यशस्वी सहभाग नोंदविला. एकांकिका, प्रहसन, मूकनाट्य, पथनाट्य व मिमिक्री या कलाप्रकारांमध्ये विद्यार्थी कलाकारांनी विशेष प्राविण्यासह सांघिक व वैयक्तिक पारितोषिके प्राप्त केली आहेत. कलाकारांनी विविध कला प्रकारामध्ये यशस्वी सहभाग नोंदवून महाविद्यालयाच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे.

संगमनेर महाविद्यालय सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ. सुरेश गुडदे, समन्वयक डॉ. बाळासाहेब पालवे आणि डॉ. राजेश्वरी सारस्वत यांच्या नेतृत्वाखाली मानाच्या पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत सहभाग घेऊन जिल्हास्तरीय युवक महोत्सवामध्ये घवघवीत यश प्राप्त केले आहे.

सर्व पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, व्यवस्थापन मंडळ आणि महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अरुण गायकवाड यांच्यासह उपप्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर सहकारी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

दि. ०३/१०/२०२६

### जाहीर नोटीस

तमाम लोकास कळविण्यात येते की,

आमचे अशील यांनी, मे. मोरे ॲण्ड गंगवाल डेव्हलपर्स तर्फे भागिदार श्री. मोहित सुनिलकुमार गंगवाल रा. कोपरगाव आणि श्री. प्रसाद रामकृष्ण मोरे रा. नाटेगांव, ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर यांचे मालकीची खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत विकत घेणे संबंधी त्यांचे बरोबर सौदा केला आहे. सदर मिळकती संबंधाने सदर जागा मालक यांनी अन्य कोणा बरोबर कोणत्याही प्रकारचा साठेखत, विक्रीबाबत व्यवहार अगर मिळकती वर गहाण, दान, बक्षीस इ. प्रकारे बोजा निर्माण करून दिलेला असल्यास अगर या मिळकतीमध्ये वरील जागामालकां शिवाय अन्य कोणाचा कोणताही हक्क हितसंबंध मालकी असल्यास अगर या मिळकती संबंधाने कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा, दरखास्त, जप्ती, ॲटॅचमेंट इ. सहकार कायदा कलम १०१ अन्वये प्रकरण इ. प्रलंबित असल्यास अशा हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी कागदोपत्री पुराव्यासह आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी आमचेकडे खाली नमूद केलेल्या पत्त्यावर नोटीस प्रसिध्द झाले पासून आठ दिवसांचे आत लेखी पुराव्यासह आणून द्यावे.

अशा हरकती न आल्यास कोणाचीही कोणतेही प्रकारची तक्रार नाही अगर अशा संबंधिताचे असलेले हक्क त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही व आमचे अशिलाचे खरेदीचे व्यवहारास बाध येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. करिता ही जाहीर नोटीस दिली असे.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन -** जिल्हा व तुकडी अहमदनगर, तालुका व सबडिस्ट्रिक्ट कोपरगांव पैकी मौजे कोपरगाव येथील बिनशेती जमिन यांसी सर्व्हे नंबर २०७/४/२१ प्लॉट नंबर ६ क्षेत्र ७.५६.७० आर.चौ.मी., आकार रू. ७.५६.७ पैसे.

यांसी चतुःसीमा पूर्व पांडे यांची मिळकत, दक्षिण अंतर्गत १२ मिटर वाईड रोड, पश्चिम प्लॉट नंबर ०८, उत्तर प्लॉट नंबर ०५

येणेप्रमाणे चतुःसीमापूर्वक फ्लॅट मिळकत तदंगभूत वस्तूंसहित, जाणेयेणेच्या वहिवाटीच्या हक्क व अधिकारासह काहीही राखून न ठेवता.

**ॲडव्होकेट सुहास शाम क्षीरसागर**
**स्नेह, विवेकानंदनगर, सेवानिकेतन शाळेजवळ**
**कोपरगाव ४२३६०१, जि. अहमदनगर**
**मोबाईल नं. ९९२२७९९३६६**

# अश्विनी ग्रामीण पतसंस्थेची ४२ वी वार्षिक सभा खेळीमेळीत

## संस्थेला ५१ लाख ८७ हजारांचा निव्वळ नफा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संस्थेचे चेअरमन मेजर संपतराव सांगळे व्हायचेअरमन भाऊसाहेब लावरे सर व्यवस्थापक बाळासाहेब डहाळे सर्व संचालक व कर्मचारी कारभार स्वच्छ व पारदर्शक ठेवून प्रामाणिकपणे काम करत आहे त्यामुळे. ठेवी वाढत आहे तरी संस्थेच्या प्रगतीसाठी विश्वासाचे सातत्य सर्वात महत्त्वाचे आहे, असे परखड मत आश्विनी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे संस्थापक गंगाधर बजाबा आंधळे यांनी व्यक्त केले. विठ्ठल मंदिर, आश्वी बुद्रुक येथे संस्थेची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन मेजर संपतराव सांगळे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी संस्थेच्या वतीने संस्थापक गंगाधर



बजाबा आंधळे यांना सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. सत्काराला उत्तर देताना गंगाधर आंधळे यांनी संस्थेच्या सुरुवातीच्या काळात सर्वपक्षीय व स्थानिक मंडळींनी मोठे सहकार्य केले. आज संस्थेला ५१ लाखांहून अधिक नफा होतोय ही समाधानाची बाब असून भविष्यातही असाच स्वच्छ व प्रामाणिक कारभार सुरू राहावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सभेत बोलताना चेअरमन मेजर संपतराव सांगळे व सरव्यवस्थापक बाळासाहेब डहाळे यांनी सांगितले की, ३१ मार्च अखेर संस्थेला ५१ लाख ८७ हजार ६२५ रुपयांचा निव्वळ आर्थिक ।नफा झाला आहे. १९८५ साली स्थापन झालेली ही संस्था सतत ’अ’ ऑडीट वर्गात असून गोरगरीब शेतकरी आणि महिलांची कामधेनू ठरली आहे.

एकूण ठेवी : २० कोटी ४ लाख १२ हजार ३४५ रुपये, कर्ज वाटप : १४ कोटी ३५ लाख ६५ हजार ३१३ रुपये, गुंतवणूक : १० कोटी २० लाख २६ हजार रुपये, वसूल भागभांडवल : ३९ लाख १२ हजार ८० रुपये, वार्षिक उलाढाल : १२१ कोटी २६ लाख १६ हजार रुपये, सीडी रेशो : ६५.८९%

थकबाकी प्रमाण : केवळ ०.८१% (एन.पी.ए. ०%), सभासद संख्या : २४६२.

सभेत सरव्यवस्थापक बाळासाहेब डहाळे यांनी विषयपत्रिका वाचन केले, तर चेअरमन मेजर संपतराव सांगळे यांनी सभासदांच्या सर्व प्रश्नांचे समर्पक निरसन केले. ताळेबंद व नफा वाटणीच्या विषयांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

या सभेस पंचायत समिती सदस्य निवृत्ती सांगळे, भगवानराव इलग विलास आंधळे मुरलीधर आंधळे, भारत गिते, विठ्ठल गायकवाड, भिका पंढरी गिते, उपाध्यक्ष भाऊसाहेब लावरे, तुळशीराम म्हस्के, संचालक सखाराम नागरे, भगवान खामकर, कल्पना बोंद्रे, पुष्पा भवर, जेहूर शेख, डॉ. अनिल बालोटे, संजय गांधी शंकर नागरे सयाजी फड रामदास दातीर ज्ञानेश्वर सांगळे कैलास आंधळे रघुनाथ जाधव नामदेव गिते नारायण बोन्द्रें सुभाष बोन्द्रें बाबुराव लावरे संजय उंबरकर अविनाश गांधी तसेच वसुली अधिकारी रमेश जाधव, शाखाधिकारी सुरेश आंधळे, विना देवळालकर, राजेंद्र मुंतोडे, सुभाष नागरे यांच्यासह सर्व शाखा सल्लागार, कर्मचारी, पिग्मी एजंट व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरुन

### हॉकीत भारताचा 'डबल' विजय

१९६६, १९९८, २०१४ आणि २०२२मध्ये पुरुष हॉकीचे सुवर्णपदक जिंकले होते. २०२६च्या विजयामुळे भारताच्या पुरुष हॉकी सुवर्णपदकांची संख्या पाच झाली आहे. महिलांनंतर पुरुषांचेही सुवर्ण यंदाच्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय हॉकीसाठी आणखी एक ऐतिहासिक अध्याय लिहिला गेला. शुक्रवारी भारतीय महिला हॉकी संघाने चीनचा १-० असा पराभव करत सुवर्णपदक पटकावले. महिला संघाने तब्बल ४४ वर्षांनंतर आशियाई क्रीडा स्पर्धेत हॉकीचे सुवर्णपदक जिंकले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी पुरुष संघानेही सुवर्णपदक जिंकल्याने एकाच आशियाई क्रीडा पर्वात भारताच्या महिला आणि पुरुष हॉकी संघांनी सुवर्णपदक जिंकण्याची ही पहिलीच वेळ ठरली. पुरुष संघाच्या या सुवर्णपदकामुळे भारताच्या २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकांची संख्या २१ झाली असून, एकूण पदकसंख्या ८५ वर पोहोचली. हॉकीतील या ऐतिहासिक कामगिरीमुळे भारताच्या २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिकच्या तयारीलाही नवी सुरुवात मिळाली आहे.

# निसर्गाच्या लहरीपणामुळे बळीराजाचे कंबरडे मोडले



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यासह संपूर्ण परिसर सध्या भीषण दुष्काळाच्या छायेत लोटला गेला आहे. ऐन वाढीच्या आणि पिकांमध्ये शेंगा भरण्याच्या अत्यंत संवेदनशील अवस्थेत असतानाच पावसाने पाठ फिरवल्यामुळे पिकांना पाण्याचा तीव्र ताण बसला आहे. विहिरींनी तळ गाठल्यामुळे सिंचनाचा एकमेव आधारही नष्ट झाला असून, निसर्गाच्या लहरीपणामुळे बळीराजाचे कंबरडे मोडले आहे.

नांदगाव शिवारातील गट क्र. ४८ मधील शेतकरी उमेश नाईकवाडी यांनी मोठ्या अपेक्षेने साडेचार एकर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी केली होती. मात्र, पावसाने साथ सोडल्याने जमिनीला मोठ्या भेगा पडल्या. एक थेंबही पाणी उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे संपूर्ण सोयाबीन पीक अक्षरशः वाळून राख झाले आणि हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला.

''जगायचं कसं आणि कुटुंबाचा गाडा कसा चालवायचा?'' या विवंचनेत सापडलेल्या नाईकवाडी यांनी अखेर हताश होऊन, आपल्या साडेचार एकरावरील उभ्या सोयाबीन पिकात ट्रॅक्टरचा रोटर फिरवण्याचा अत्यंत जिव्हारी लागणारा आणि मन हेलावून टाकणारा निर्णय घेतला.

खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेल्याने आधीच आर्थिक संकट ओढवले आहे. त्यातच विहिरी पूर्णपणे कोरड्या पडल्यामुळे आगामी रब्बी हंगामात पिके कशी घ्यायची, हा मोठा यक्षप्रश्न परिसरातील शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. निसर्गाच्या लहरीपणापुढे आणि शासनाच्या कागदोपत्री मदतीपुढे हतबल झालेल्या या बळीराजावर आलेली ही बिकट वेळ पाहून परिसरातील सर्वसामान्य नागरिकांचेही काळीज पिळवटून जात आहे.

## आदर्श विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**सोनई :** सेवा संकल्प अभियानांतर्गत हनुमान ग्रामीण पानंसवाडी येथील स्व. माजी खासदार तुकारामजी गडाख संचालित आदर्श विद्यालयाच्या माध्यमिक विभागामध्ये वकृत्व स्पर्धा सपन्न झाल्या. त्यामध्ये घेण्यात आल्याल्या एकूण ३० विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. या स्पर्धेसाठी आवटे यांनी विद्यार्थ्यांची शाब्दिक फेक, पाठांतर करून उपस्थिताची मने जिकली. विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. पी.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वकृत्व स्पर्धा मंगलमय वातावरणामध्ये घेण्यात आल्या. यावेळी वकृत्व स्पर्धेचे पर्यवेक्षण रासने व वीरकर यांनी केले. उच्चार, विषय मांडणी, आत्मविश्वास व व्यासपीठ यां सर्व बाबतीत अचूक निरीक्षण करत पर्यवेक्षणात विद्यार्थिमध्ये सेवाभाव व राष्ट्रप्रेम जाणीव निर्माण करणे हा उद्देश सांगितले. विजेतेचे तीन क्रमांक काढण्यात आले.यां विजेताचे संस्थेचे अध्यक्षा जयश्रीताई गडाख व सचिव रविराज गडाख यांनी कौतुक केले आहे.

## प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करावे : आ. खताळ



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** बदलते हवामान आणि वाढते तापमान लक्षात घेता पर्यावरणाचे संतुलन राखणे ही काळाची गरज आहे. संपूर्ण राज्यात सद्यस्थितीला निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थिती वरती मात करण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करून संवर्धन करावे असा संदेश आमदार अमोल खताळ यांनी दिला

ग्लोबल वार्मिंग वर मात करण्या साठी तसेच वृक्ष संवर्धन करून त्याचे संगोपन करण्याचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज दक्षिण पीठ, नाणीजधाम, यांचे उपपीठ असलेल्या नाशिक रामशेज येथून निघालेल्या 'वसुंधरा पायी दिंडी सोहळ्याचे' संगमनेर-सिन्नर तालुक्याच्या सरहद्दीवरील कर्हे घाट येथे अहिल्यानगर जिल्ह्यातील स्वामी नरेंद्राचार्य महाराज भक्त मंडळाच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.यानंतर वसुंधरा पायी दिंडी घुलेवाडी येथील अमृता लॉन्स येथे मुक्कामी होती. सकाळी दिंडी आळेफाट्याकडे मार्गस्थ होत असताना चंदनपुरी येथील सिद्धू लॉन्स येथे दर्शनासाठी तसेच महा प्रसादासाठी काही काळ थांबली. यावेळी आमदार अमोल खताळ पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले यावेळी जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज भक्त मंडळाचे पदाधिकारी, महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी आमदार अमोल खताळ यांनी स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. भक्त मंडळाच्या वतीने आमदार खताळ यांचा सन्मान करण्यात आला.

आ. खताळ म्हणाले, पर्यावरणाचे संरक्षण करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. वसुंधरा पायी दिंडीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रत्येक गावागावात पोहोचविला जात आहे. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये वृक्ष लागवड आणि वृक्षसंवर्धनाबाबत जनजागृती होण्यास निश्चितच मदत होत आहे. प्रत्येकाने एक झाड लावून ते केवळ जगविण्याचीच नव्हे, तर त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे आवाहन केले.

## निलंबन रद्द करून निष्पक्ष चौकशी करा, सुलताना शेख यांची जि.प. सीईओंकडे मागणी

**राहुरी :** तालुक्यातील देसवंडी येथील शिरसाटवस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील उपशिक्षिका सुलताना जावेद शेख यांनी आपल्यावरील निलंबनाची कारवाई रद्द करून संपूर्ण प्रकरणाची त्रयस्थ वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे. पत्रकार परिषदेत त्यांनी आपल्याविरुद्ध करण्यात आलेल्या तक्रारींबाबत भूमिका मांडली. सहकारी शिक्षक आबा दगडू कडूस यांनी खोट्या तक्रारी करून आपल्याविरुद्ध कटकारस्थान केल्याचा आरोप शेख यांनी केला. शाळेतील कामकाजावरून मतभेद झाल्यानंतर संबंधित शिक्षकाने पालकांमध्ये आपल्याबाबत गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे. विद्यार्थ्यांना मारहाण झाल्याच्या घटनांबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले असून, या घटनांचे पुरावे शाळेतील सीसीटीव्ही चित्रफितींमध्ये असल्याचा दावा केला आहे. शेख किरकोळ रजेवर असताना २८ जुलै रोजी संबंधित शिक्षकाने शाळेच्या कार्यालयात प्रवेश करून कपाटाच्या चाव्या घेतल्या आणि शासकीय कागदपत्रे ठेवलेले कपाट उघडून कागदपत्रांची उचकापाचक केल्याचा आरोप त्यांनी केला. ही घटना सीसीटीव्हीमध्ये नोंदली असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यानंतर २९ जुलै रोजी सीसीटीव्ही यंत्रणेत छेडछाड झाल्याचा आरोप त्यांनी केला. सीसीटीव्हीचा संकेतशब्द बदलल्यामुळे काही दिवस चित्रफिती पाहता आल्या नाहीत. त्यानंतर २७, २८ व २९ जुलैच्या चित्रफिती तपासल्या असता काही भाग उपलब्ध नसल्याचे शेख यांनी म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर सीसीटीव्ही यंत्रणेतील मूळ नोंदी, ध्वनिचित्रमुद्रक व संगणकीय नोंदींची तांत्रिक तपासणी करावी, तसेच संबंधित शिक्षकासह प्रकरणातील अधिकाऱ्यांच्या भूमिकेची स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी शेख यांनी केली आहे.

# खेळाडूंच्या जिद्दीने बाभळेश्वर गाजले!

## खो-खो च्या मैदानात ७० संघांची लढत



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर:** राहाता तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला व्यासपीठ मिळवून देणाऱ्या तालुकास्तरीय खो-खो क्रीडा स्पर्धांना शनिवारपासून उत्साहात प्रारंभ झाला. कै. श्री. नाथाजी पाटील म्हस्के शैक्षणिक संस्थेचे विद्या विकास पब्लिक स्कूल, बाभळेश्वर, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर आणि श्री. यशवंतराव चव्हाण विद्यालय, राजुरी यांच्या संयुक्त विद्यमाने २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

१४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुले व मुलींच्या या स्पर्धा ३ व ४ ऑक्टोबर रोजी दोन दिवस रंगणार असून राहाता तालुक्यातील सुमारे ७० संघांचा सहभाग राहणार आहे. त्यामुळे बाभळेश्वर येथील क्रीडांगणावर खो-खोच्या थरारक सामन्यांची पर्वणी क्रीडाप्रेमींना अनुभवता येणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन कै. श्री. नाथाजी पाटील म्हस्के शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब नाथाजी पाटील म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्या विकास पब्लिक स्कूलचे प्राचार्य राजेंद्र नालकर, नाथाजी पाटील म्हस्के ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य ज्ञानेश्वर कांदळकर,कांबळे सर, सय्यद सर, राजेंद्र गायकर, अश्विनी पारखे मॅडम यांच्यासह राहाता तालुक्यातील क्रीडा क्षेत्रातील मार्गदर्शक, विद्यार्थी, शिक्षक व क्रीडा रसिक उपस्थित होते.

क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठी विद्या विकास पब्लिक स्कूलचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व राहाता तालुका क्रीडा समितीच्या मार्गदर्शनाखाली सुनील गागरे (अध्यक्ष), अनिल चिंधे (कार्याध्यक्ष), राष्ट्रीय पंच राजेंद्र कोहकडे आणि बबनराव सातकर यांनी स्पर्धेचे कामकाज पाहिले. विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला चालना देणाऱ्या या स्पर्धांमुळे बाभळेश्वर परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले आहे.

# गांधी-शास्त्री विचारांचा जागर; विद्यार्थ्यांनी घेतली स्वच्छतेची शपथ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** रयत शिक्षण संस्थेच्या प्रवरा परिसरातील महात्मा गांधी संकुलात राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी संकुलाचे प्राचार्य दिलीप डहाळे, मुख्याध्यापिका नलिनी जाधव, पर्यवेक्षिका संगीता सांगळे तसेच शिक्षकांच्या हस्ते




महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत संगीता उगले यांनी केले. यावेळी डॉ. शरद दुधाट व प्राचार्य दिलीप डहाळे यांनी मनोगत व्यक्त केले. महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा व स्वच्छतेच्या विचारांसह लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रनिष्ठेचा आदर्श विद्यार्थ्यांनी जीवनात अंगीकारावा, असे आवाहन करण्यात आले.

प्राचार्य दिलीप डहाळे यांनी आपल्या मनोगतात दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा वारसा पुढे न्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमास प्र. उपप्राचार्य संजय डुबे, शिवाजी काळे, संजय ठाकरे, देवेश आहेर, माधुरी वडघुले, रविंद्र मेढे, विलास गभाले, बाबासाहेब अंत्रे यांच्यासह शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते. सूत्रसंचालन संगीता उगले यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी नरेंद्र ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. त्यानंतर तिन्ही विभागांतील विद्यार्थ्यांनी मैदान व विद्यालय परिसरात श्रमदान करून स्वच्छतेचा संदेश दिला. तसेच वसतिगृहातील विद्यार्थ्यांना पाण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. स्वच्छता, जलसंवर्धन आणि राष्ट्रसेवेची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# नगरपरिषद व मदर तेरेसा इंग्रजी शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने

## शहरात 'स्वच्छ भारत-नशामुक्त भारत अभियान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त नगरपरिषद व भारतरत्न मदर तेरेसा इंग्रजी शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने गंगापूर शहरात 'स्वच्छ भारत-नशामुक्त भारत अभियान राबविण्यात येऊन शहरात भव्य जनजागृती रॅली काढून शहरात ठिकठिकाणी स्वच्छता करुन स्वच्छ भारत-नशामुक्त भारत'संदेश देण्यात आला. गंगापूर येथील भारत रत्न मदर तेरेसा इंग्रजी शाळेतून विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत-नशामुक्त भारत रॅलीची सुरुवात करून शहरातील लासुर नाका, जिजामाता चौक, बसस्थानक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व, व्यसनमुक्त जीवनशैली आणि सामाजिक आरोग्याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने या रॅलीचे



आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचे समारोप शिवतीर्थ येथे करण्यात आले.या रॅलीमध्ये विद्यार्थी, शिक्षक, नगरपरिषद पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांनी विविध घोषणांच्या माध्यमातून स्वच्छता व नशामुक्तीचा प्रभावी संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण विद्यार्थ्यांनी साकारलेल्या विविध महापुरुषांच्या वेशभूषा हे ठरले. कार्यक्रमाप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वगत, नृत्य, प्रभावी भाषणे तसेच रंगतदार नाटके सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले होते.

रॅलीच्या माध्यमातून 'स्वच्छ भारत-नशामुक्त भारत', 'नशा हटवा-जीवन वाचवा', 'स्वच्छता हीच सेवा' अशा विविध घोषणांद्वारे जनजागृती करण्यात आली. हातात जनजागृतीपर फलक घेऊन विद्यार्थ्यांनी नागरिकांना स्वच्छता राखण्याचे तसेच व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले.यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष संजय जाधव, पोलीस निरीक्षक सलीम चाऊस, उपनगराध्यक्ष अमोल दादा जगताप, नगरसेवक संतोष अंबिलवादे,नगरसेवक-नगरसेविका सुवर्णा जाधव,मुख्याधिकारी संतोष आगळे,भारतरत्न मदर तेरेसा इंग्रजी शाळेचे व्यवस्थापक फादर विल्फ्रेड सल्ढाना,पिएस आय मधुकर मोरे,अरविंद नाहटा, शितल नावंदर,रेखा राजपूत, संगीता वाघ, तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षक, पालक व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अनुजा कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा झोजे व श्रुती पंडित यांनी केले. तर आभार प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश झोजे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गंगापूर नगरपरिषद व भारतरत्न मदर तेरेसा इंग्रजी शाळेचे व्यवस्थापक फादर विल्फ्रेड सल्ढाना , मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# रोजगाराची कामे तातडीने सुरू करा : उपसभापती राजेश्वर हिवाळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर:** तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन मजूर व रोजंदारीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांसमोर रोजगाराचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे. या पार्श्वभूमीवर विकसित भारत-रोजगार व उपजीविका हमी अभियान अंतर्गत गावागावात मोठ्या प्रमाणावर रोजगाराची कामे तातडीने सुरू करावीत,अशी मागणी पंचायत समितीचे उपसभापती राजेश्वर कल्याण हिवाळे यांनी निवेदनात केली आहे.



जिल्हाधिकारी विनय जी.गौडा यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावांमध्ये विशेष रोजगार मोहीम तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीत रोजगाराची मागणी नोंदवून पात्र कामांना त्वरित मंजुरी द्यावी, जेणेकरून मजुरांवर स्थलांतराची वेळ येणार नाही नाला खोलीकरण, रुंदीकरण,गाळ काढणे, बंधारे, पाणलोट विकास व शेततळे यांसारख्या जलसंधारण कामांना प्राधान्य द्यावे. अल्पभूधारक,भूमिहीन तसेच अनुसूचित जाती-जमातीतील लाभार्थ्यांसाठी वैयक्तिक लाभाची कामे मंजूर करावीत, प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी प्रक्रियेला गती द्यावी आणि जाचक अटी शिथिल करण्यात यावे.मजुरांच्या मजुरीचे वेळेत भुगतान करून ग्रामपंचायत निहाय रोजगाराचे उद्दिष्ट निश्चित करावे व नियमित आढावा घेण्याची मागणी गंगापूर पंचायत समितीचे उपसभापती राजेश्वर हिवाळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

### निधन

## विमलबाई झिने



**भोकर (वार्ताहर)** - श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथील गं.भा. विमलबाई एकनाथ झिने (वय-८१) यांचे नुकतेच अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचे पश्चात दोन मुले, दोन सुना, नातवंडेव परतवंडे असा परीवार आहे. येथील सबस्टेशनजवळ झिने वस्ती येथे राहत असलेले व अशोक सहकारी साखर कारखाण्याचे सेवक ज्ञानेश्वर झिने व इस्कॉन सेवेतील चंद्रकांत झिने यांच्या त्या मातोश्री होत.

# गुरुधानोरा परिसरात खदानीतून अवैध उत्खनन बंद करण्याची मागणी





**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर:** तालुक्यातील गुरुधानोरा परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून अवैध खदानीतून उत्खनन व धोकादायक ब्लास्टिंग त्वरित बंद करण्याची मागणी गणेश भावले यांनी निवेदनात केली आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की गंगापूर तालुक्यात गुरुधानोरा परिसरात अवैध खदानीतून धोकादायक ब्लास्टिंग करुन दगडाचे मोठ्या प्रमाणावर विनापरवाना उत्खनन सुरू असल्याने शासनाचा लाखो रुपये महसुल बुडत आहे. खदानीतून दिवस- -रात्र तीव्र क्षमतेचे ब्लास्टिंग करण्यात येऊन उत्खनन सुरू असल्याने परिसरातील घरांना तडे जात असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. ब्लास्टिंगमुळे होणारा प्रचंड आवाज व धुळीमुळे वृद्ध, महिला व रुग्णांना त्रास सहन करावा लागत तसेच शेतजमिनी, नैसर्गिक जलस्रोत आणि पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे . सुरू असलेल्या अवैध खदानीतून ब्लास्टिंग करुन उत्खनन बंद करण्यात यावे म्हणून भावले यांनी आमदार प्रशांत बंब व संबंधित अधिकाऱ्याकडे वारंवार तक्रारी करूनही संबंधित भू-माफियांवर विरोधात अद्याप पर्यंत कुठलीही कायदेशीर कारवाई केली नाही.एक प्रकारे भु-माफियांना अभय दिल्याचे आरोप करण्यात येत आहे.

गुरुधानोरा परिसरात सुरू असलेल्या अवैध खदानीतून उत्खनन व धोकादायक ब्लास्टिंगची एटीएस मार्फत मोजणी होऊन एक महिना उलटला मात्र अद्याप पर्यंत कुठलीही कारवाई करण्यात आली नसून त्वरित कारवाई करावी.

--गणेश भावले-
तक्रारदार गुरुधानोरा ता.गंगापुर .

गुरुधानोरा परिसरात अवैध खदानीतून उत्खनन व धोकादायक ब्लास्टिंग सुरू असल्याने दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशीकरुन या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन संबंधित विभागांना तातडीने कारवाईचे आदेश द्यावेत, अशी मागणी भावले यांनी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनाच्या प्रती महसूल मंत्री, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना देण्यात आल्या आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

रविवार दि. ०४ ऑक्टोबर २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | १८० १७२ ११५ | ४ | १५८ २४८ २२० | ० | ३४५ ३९२ ३३६ |

१७-७०-६४-४५-६५-२४

**कल्याण**

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १२० ३४६ ३३७ | ० | १९० २८० ४६० | १ | १४६ १२९ ११९ |

७३-३२-४०-०६-१८-१९

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | १४९ २३९ ३९० | ६ | १६९ २६८ ६०० | १ | १७९ २७८ ७०० |

१४-४३-२६-६८-०७-७९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 01/06/2026 to 05/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 12/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 26/06/2026 | 336 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 10/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 17/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 24/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |

## द • ख • ल



## सेवा संकल्प अभियानातून चापडगाव प्लास्टिक मुक्तीचा संकल्प

**शेवगाव :** राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त चापडगाव येथे सेवा संकल्प अभियान उत्साहात राबविण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक यांच्या माध्यमातून प्लास्टिक मुक्त चापडगाव करण्याचा सामूहिक संकल्प करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन विद्यालयाचे प्राचार्य संपत दसपुते, उपमुख्याध्यापक सुनील जायभाये,पर्यवेक्षक संजय दुधाडे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर इयत्ता दहावी ब व क या वर्गातील विद्यार्थी व शिक्षकांनी विविध परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. रस्ते, सार्वजनिक ठिकाणी व परिसरातील प्लॅस्टिक कचरा संकलित केला व त्याची योग्य विल्हेवाट लावली. यावेळी प्लास्टिकचा वापर टाळा, पर्यावरणाचे रक्षण करा, स्वच्छ चापडगाव सुंदर चापडगाव अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर न करता कापडी व पर्यावरण पूरक पिशव्यांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक संजय मरकड, नितीनकुमार फोफसे हे आपल्या मनोगतात म्हणाले की,महात्मा गांधी यांच्या स्वच्छता व स्वावलंबनाच्या विचारांना व लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, कर्तव्यनिष्ठ व राष्ट्रसेवेच्या आदर्शांना अभिवादन करत स्वच्छ, सुंदर व प्लास्टिक मुक्त गाव करा असा संकल्प करून या महामानवाचा एक तरी आदर्श घ्यावा व तसे कार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना स्वच्छतेची सामूहिक शपथ देण्यात आली. आपणही गाव स्वच्छतेसाठी या मोहिमेमध्ये सहभागी होऊन त्यांना सहकार्य करावे असा मानस काही ग्रामस्थांनी बोलून दाखवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सर्जे राव निकाळजे यांनी केले तर आभार प्रभाकर मराठे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदांचे सहकार्य लाभले.

## शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा सेनापती बापट विद्यालयात उत्साहात संपन्न



**पारनेर :** महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेली शासकीय चित्रकला एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा सेनापती बापट विद्यालयातील परीक्षा केंद्रावर चार दिवस उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध व कलापूर्ण वातावरणात नुकतीच संपन्न झाली. या परीक्षेत विविध विद्यालयांतील तब्बल ६७६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांनी स्मरणचित्र, वस्तुचित्र, संकल्पचित्र, कर्तव्य भूमिती व अक्षरलेखन या विषयांमध्ये आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. रेखाटनातील अचूकता, प्रमाणबद्धता, रंगसंगती, कल्पकता, निरीक्षणशक्ती आणि सौंदर्यदृष्टी यांचा प्रभावी वापर करत विद्यार्थ्यांनी कलात्मक अभिव्यक्तीचे दर्शन घडविले. संजय पठाडे सर यांचे मार्गदर्शन परीक्षेच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य कलाशिक्षण मंडळाचे माजी परीक्षा समिती सदस्य तथा अहिल्यानगर कलाशिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय पठाडे यांनी परीक्षा केंद्राला भेट देऊन विद्यार्थी व परीक्षा समितीला मार्गदर्शन केले. परीक्षा केंद्रावरील नियोजन, शिस्त आणि व्यवस्थेची पाहणी करून त्यांनी आयोजकांचे कौतुक केले. परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विविध विद्यालयांतील शिक्षक व कलाशिक्षक अनिल जाधव, विजय पठारे, संजय धाडगे, संतोष पारधी, संतोष दहिफळे, ऋषिकेश नगरे, संदीप पांढरे, सुनंदा बोरुडे, राणी सावंत, जयश्री शिंदे, मिनाक्षी ठुबे, नामदेव औटी, संतोष रणदिवे आणि आकाश ठोकळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

## ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी आधार आपुलकी फाउंडेशनचा पुढाकार



**अहिल्यानगर :** आनंद योग सेंटरच्या पुढाकाराने आधार आपुलकी फाउंडेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत श्री. गोविंद रामभाऊ खापरे यांना तीन चाकी सायकल भेट देण्यात आली. अहिल्यानगरमधील प्रसिद्ध डॉक्टर श्री. सुचित तांबोळी आणि सौ . नेहा तांबोळी यांच्या विशेष सहकार्याने हा उपक्रम पार पडला. डॉ. सुचित तांबोळी यांचे वडील स्व. सुरेश गंगाधर तांबोळी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या पत्नी श्रीमती सविता सुरेश तांबोळी यांच्या हस्ते श्री. गोविंद रामभाऊ खापरे यांना सदर तीन चाकी सायकल प्रदान करण्यात आली.

# वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन ही आगामी काळाची गरज : आ. जगताप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पृथ्वीवरील तापमान दिवसेंदिवस वाढत असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धन करणे ही आगामी काळाची गरज आहे. प्रत्येकाने किमान पाच रोपे लावून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स अँड सर्व्हेयर्स असोसिएशन अहिल्यानगर यांच्या वतीने माजी अध्यक्ष मकरंद देशपांडे आणि पोलाद स्टील यांच्या सहकार्याने ओंकार कॉलनी, नागापूर परिसरात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचा संदेश देणारा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी आमदार संग्राम जगताप यांचा विशेष सत्कारही करण्यात आला.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, पृथ्वीवरील तापमान सातत्याने वाढत आहे. त्यामुळे वृक्षारोपण करणे ही आता केवळ सामाजिक जबाबदारी नसून काळाची गरज झाली आहे. मात्र झाडे लावण्याबरोबरच त्यांचे संवर्धन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. वृक्षारोपण करताना त्या ठिकाणी विद्युत वाहिन्या किंवा लाईटच्या तारा आहेत का, झाडांमुळे रस्ते, गटार किंवा इतर सुविधांना अडथळा निर्माण होणार नाही ना, याची काळजी घेणे आवश्यक आहे. लावलेल्या रोपांचे संरक्षण करण्यासाठी ट्री गार्डची व्यवस्था करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार संग्राम जगताप यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांना वेळोवेळी सहकार्य केले आहे. कल्याण रोडवरील ऐसा सिटीमधील ओपन स्पेस डेव्हलपमेंटसाठी कंपाउंड आणि स्टेज अंतर्गत



सजावटीच्या कामासाठी आमदार निधीतून मोठी मदत मिळाली आहे. या सहकार्याबद्दल संस्थेच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांचा सन्मान करण्यात येत असल्याचे देशपांडे यांनी नमूद केले.

महापौर ज्योती गाडे यांनी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व विशद करत शहर हिरवेगार करण्यासाठी सर्व नगरकरांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. शहरातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून विशेष काम करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमहापौर धनंजय जाधव यांनी अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आगामी वर्षात एक लाख वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार आतापर्यंत दहा हजारांपेक्षा अधिक झाडे लावण्यात आली असून त्यांचे संवर्धनही करण्यात येत आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

नगरसेवक कुमार वाकळे यांनी आपल्या वॉर्डमध्ये वृक्षारोपण करताना केवळ फळझाडे आणि फुलझाडे न लावता काही जंगली तसेच यापूर्वी परिसरात न पाहिलेल्या विविध प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर एडवोकेट धनंजय जाधव स्थायी समिती माजी सभापती कुमारसिंह वाकळे ऐसाचे अध्यक्ष प्रदीप तांदळे पोलाद स्टीलचे सुशांत गव्हाणे, आदेश गुंगे, नगरसेविका, आशाताई कातोरे, सुनिता भिंगारदिवे, नवनाथ कातोरे, करण कराळे, महेश लोंढे राजेश कातोरे , ऋग्वेद गंधे, ह. भ. प. तुकाराम महाराज कातोरे, अश्विनी देशपांडे, साक्षी देशपांडे, सुनील औटी, अनिल मुरकुटे, अजय दगडे, साहेबराव बोरुडे, आबासाहेब कर्डिले, रत्नाकर कुलकर्णी, अनिल आठरे, दिलीप कर्नावट, बबनराव कातोरे, , मनोज दुल्लम, बाळासाहेब जगताप, आकाश कातोरे, लोभाजी कातोरे, हनुमान कातोरे, , साहेबराव सप्रे यांच्यासह संस्थेचे सभासद आणि नागरिक उपस्थित होते.

# शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील मराठा समाजाचे प्रश्न तातडीने सोडवा : लबडे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव:** मराठा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सकल मराठा समाज, शेवगाव-पाथर्डी तालुक्याच्या वतीने मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनामध्ये कुणबी नोंद असलेल्या पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देताना होणारी अडवणूक थांबवावी, जुन्या शासकीय अभिलेखांमध्ये कुणबी, कुणबी-मराठा अथवा मराठा-कुणबी नोंद असलेल्या नागरिकांच्या प्रकरणांचा पारदर्शक व कालबद्ध पद्धतीने निपटारा करावा, अशी मागणी करण्यात आली.

तसेच कुटुंबातील रक्ताच्या नात्यातील व्यक्तीची जात वैधता



झालेली असल्यास, त्याच्या सख्ख्या भावाला शपथपत्र, पूर्वीच्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रत व रक्ताचे नाते सिद्ध करणारी कागदपत्रे यांच्या आधारे लागू नियमांनुसार जात वैधता देण्याची प्रक्रिया सुलभ करावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.

गावपातळीवरील कुणबी नोंदी नागरिकांना सहज उपलब्ध व्हाव्यात, जात प्रमाणपत्र व जात वैधतेसाठी विशेष शिबिरे आयोजित करावीत, तसेच प्रलंबित प्रकरणांसाठी स्वतंत्र कालबद्ध मोहीम राबवावी, अशी मागणीही करण्यात आली.

याशिवाय अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या पात्रता प्रमाणपत्र काढण्यासाठी होणारा विलंब दूर करून पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे लवकर उपलब्ध करून द्यावीत, तसेच ३१ डिसेंबर २०२५ पूर्वीच्या पात्र लाभार्थ्यांना बँकेचे मंजुरी पत्र ऑनलाइन अपलोड करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्यावी, या मागण्या सह अन्य मागण्यांचे निवेदन देण्यात आले

शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील नागरिकांच्या या प्रश्नांवर संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देऊन कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्यात यावी, अशी मराठा सेवक चंद्रकांत महाराज लबडे यांनी मराठा समाजाच्या वतीने केली.

# गुवाहाटीच्या कामाख्या मंदिरात संयुक्त अग्निज्योत प्रज्वलित



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** दरवर्षी विविध धार्मिक उपक्रमांनी साजरा होणाऱ्या नवरात्र उत्सवाला यंदा आगळेवेगळे धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवप्रहार संघटनेचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा ज्योतिष तज्ज्ञ संतोष घोलप यांच्या संकल्पनेतून यंदा 'कामाख्या देवी-त्रिपुरा सुंदरी संयुक्तिक नवरात्र उत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या उत्सवानिमित्त पूर्वोत्तर भारतातील दोन प्रमुख शक्तीपीठांच्या संयुक्त अग्निज्योतीचा संयोग आसाममधील गुवाहाटी येथील कामाख्या मंदिरात घडवून आणण्यात आला.

गुवाहाटीच्या कामाख्या मंदिरात छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या जयघोषात आयोजक संतोष घोलप यांच्या हस्ते संयुक्त पवित्र अग्निज्योत प्रज्वलित करण्यात आली.

# ड्रेनेज लाईन व ऐतिहासिक बारवेच्या प्रश्नांवर उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

सारोळा कासार ग्रामपंचायतीच्या कारभारावर आक्षेप

**नगर तालुका :** नगर तालुक्यातील सारोळा कासार येथे सुरू असलेल्या रस्त्याच्या काँक्रिटिकरणादरम्यान ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी आणि १५० ते २०० वर्षांपासून गावाला पाणी पुरवठा करणारी ऐतिहासिक बारव बुजवण्यात येऊ नये, या प्रमुख मागण्यांसाठी येथील माजी उपसरपंच जयप्रकाश पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या मागण्या मान्य न झाल्यास दिनांक ४ ऑक्टोबर रोजी श्री हनुमान मंदिर, सारोळा कासार येथे आमरण उपोषणाचा इशारा त्यांनी ग्रामपंचायत अधिकारी व प्रशासनाला दिला आहे.

याबाबत जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. सारोळा कासार येथील देवीभोयरे ते पारनेर मार्गे खडकी या नवीन काँक्रिटिकरणाच्या रस्त्याचे काम सुरू आहे. हे काम करत असताना गावाच्या हद्दीत इतर गावांप्रमाणेच ड्रेनेज लाईन तयार करून सांडपाण्याची व्यवस्था करणे गरजेचे होते. मात्र रस्त्याचे काम सुरू असताना पूर्वीची ड्रेनेज लाईन उखडून टाकण्यात आल्यामुळे आणि नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याबाबत मनमानी कारभार सुरू असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

गेल्या १५० ते २०० वर्षांपासून संपूर्ण गावाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणारी जुनी बारव बुजविण्याचा घाट ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी घातल्याचा आरोप करण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या विरोधामुळे बारव वगळून रस्त्याचे काम सुरू केले असले, तरी त्या शेजारील जिवंत बोरवेलचे पाणी नवीन बांधलेल्या विहिरीत सोडण्याचे नियोजन केले जात आहे. नवीन विहिरीमध्ये बोअरवेलचे पाणी नेण्यास आमचा विरोध नाही, परंतु जुन्या बारवचे कनेक्शन बंद करून ती जागीच बंद करणे चुकीचे असून यामुळे महिला वर्गाला रात्रीच्या वेळी पाणी भरण्यासाठी लांब व असुरक्षित ठिकाणी जावे लागेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### वर्षा पंडित, चंद्रशेखर महामुनी यांच्या सुरांनी रंगली सुरेल मैफल

**अहिल्यानगर :** श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'मेरी आवाज ही पहचान है' हा गीतांचा कार्यक्रम यंदा नेहमीपेक्षा जरा हटके संकल्पनेतून साकारण्यात आला. भारतरत्न लता मंगेशकर यांना समर्पित करण्यात येणाऱ्या या कार्यक्रमात यंदा लतादीदींसोबतच त्यांच्या समकालीन काळाला आपल्या आवाजाने समृद्ध करणाऱ्या आशा भोसले आणि सुमन कल्याणपूर यांचेही स्मरण करण्यात आले. याचबरोबर हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळात आपल्या आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या विविध गायिकांना त्यांच्या अजरामर गीतांच्या माध्यमातून श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी नगरचे प्रसिद्ध आरजे प्रसन्न पाठक यांनी आपल्या अनोख्या मिश्कील शैलीत प्रेक्षकांशी संवाद साधला. त्यांनी थेट प्रेक्षकांमध्ये फिरून त्यांच्या आवडीची गाणी प्रेक्षकांकडूनच गाऊन घेतली. त्यामुळे कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच रसिकांमध्ये उत्साहाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले.

# ताजनापूर योजनेत शेवगाव परिसराचा समावेश करा

पाझर तलाव भरून देण्याची आ. राजळे यांच्याकडे मागणी




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव :** ताजनापूर उपसा जलसिंचन योजनेत मौजे शेवगाव परिसरातील विविध वाड्या-वस्त्यांचा समावेश करून या भागातील पाझर तलाव पाण्याने भरून देण्यात यावेत, अशी मागणी नगरसेवकांसह परिसरातील नागरिकांनी आमदार मोनिका राजळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

श्री महादेव मंदिर परिसर, गहिले वस्ती, गर्जे वस्ती, ढाकणे वस्ती, गावडे-वाकडे वस्ती, जहागीरदार वस्ती आणि लांडे वस्ती या परिसरांचा ताजनापूर उपसा जलसिंचन योजनेत समावेश करण्यात यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या परिसरातील पाझर तलाव पाण्याने भरल्यास शेतीसाठी सिंचनाची सुविधा उपलब्ध होण्याबरोबरच भूजलपातळी वाढण्यास आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागण्यास मदत होणार आहे. त्यामुळे ताजनापूर योजनेच्या माध्यमातून या भागातील पाझर तलाव भरून देण्यासाठी संबंधित विभागाला आवश्यक सूचना देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

शेवगाव परिसरातील वाड्या-वस्त्यांना योजनेचा लाभ मिळाल्यास शेतकरी व नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याने या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अशी अपेक्षाही निवेदनकर्त्यांनी व्यक्त केली.

यावेळी नगरसेवक डॉ. नीरज लांडे, नगरसेवक सागर फडके, नगरसेवक नितीन दहिवाळकर, गणेश कोरडे, बापूराव धनावडे, सुदाम गावडे, कल्याण ढोरकुले, गोरख गोडसे, बबन लांडे, विनायक ढाकणे, बाबासाहेब वाकडे आदी उपस्थित होते.

# शेवगावच्या पाणीटंचाईवर तातडीच्या उपाययोजनांची मागणी

अरुण मुंढे यांनी पालकमंत्री विखे पाटील यांना दिले निवेदन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर :** शेवगाव शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शिवसेना नेते अरुण मुंढे यांनी जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन शहराच्या पाणीपुरवठ्याबाबत सविस्तर निवेदन दिले. लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, आखेगाव रोड येथे झालेल्या टंचाई आढावा बैठकीदरम्यान हे निवेदन देण्यात आले.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जुन्या योजनेतील चारही पंपांची डिझाईन लाईफ पूर्ण झाली असून, वारंवार दुरुस्ती करूनही त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम झाला आहे. परिणामी पंपांचा अपेक्षित डिस्चार्ज २.५ लाख लिटरपेक्षा अधिक



असताना सध्या तो सुमारे १.५ लाख लिटरपर्यंत घसरला आहे.

या चारही पंपांच्या नूतनीकरणासाठी अंदाजे एक कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, दोन्ही नगरपरिषदांनी प्रत्येकी ५० लाख रुपये थकीत पाणीपट्टीमधून भरण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार शेवगाव नगरपरिषदेने ५० लाख रुपये भरले आहेत. मात्र, पाथर्डी नगरपरिषदेची रक्कम अद्याप जमा न झाल्याने नवीन पंप बसविण्याच्या प्रक्रियेला विलंब होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

पंपांची अपुरी क्षमता आणि दुष्काळजन्य परिस्थितीमुळे सध्या शेवगाव शहरात १६ ते १७ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत आहे. तसेच शहरातील विविध वाड्या-वस्त्यांमधील बोअरवेल व विहिरींचे पाणी आटल्याने नागरिकांची पाण्यासाठी मोठी गैरसोय होत आहे. या पार्श्वभूमीवर नवीन पंप तातडीने उपलब्ध करून देण्यास गती द्यावी तसेच पाणीटंचाईग्रस्त वाड्या-वस्त्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक मंजुरी द्यावी, अशी मागणी अरुण मुंढे यांनी केली.

शेवगाव शहरातील नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी शासन व प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# आनंद तीर्थ समवशरण येथे जिनेश्वरी अधिवेशन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन भूमीत आनंद तीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासात शुक्रवारी भव्य जिनेश्वरी अनुष्ठान पार पडले. हजारो महिलांनी यात सहभाग घेतला. नगरसह महाराष्ट्र तसेच देशाच्या विविध भागातून आलेल्या भाविकांनी यात सहभाग घेतला. 'अहिल्यानगरकी गलियो में कमाल हो गया, सबको गुरू आनंद का दिदार हो गया', या गीताने परिसर दुमदुमला.

आनंद तीर्थ समवशरण येथे महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर पूज्य प्रविण ऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा., महासतीजी पूज्य सत्यप्रभाजी म.सा., पूज्य अमितज्योतीजी






म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यालत झालेल्या जिनेश्वरी अधिवेशनास अयोध्येतील राम मंदिर ट्रस्टचे महा सचिव पूज्य गोविंददेवगिरीजी महाराज यांच्यासह समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटी उपस्थित होते. कमिटीच्या वतीने गोविंददेवगिरीजी महाराज यांचा सन्मान करण्यात आला.

पूज्य प्रविण ऋषीजीमहाराज म्हणाले, जिज्ञासेतूनच नवीन ज्ञान प्राप्त होते. जंबूस्वामींनी सुधर्मा स्वामींना जिज्ञासेतून तीर्थंकर महावीर यांच्या विषयी माहिती विचारली आणि त्यानंतर सुधर्मा स्वामींनी त्यांच्या अनुभूतीतील भगवान महावीर यांचे सुंदर वर्णन केले. आज तीर्थंकरांची शक्ती येथे जिनेश्वरी अधिवेशनात दिसून येत आहे. तीर्थंकरांच्या शक्तीतून जिनेश्वरी विश्वेश्वरी बनेल. महासागरातून आपण पाणी घेऊ शकत नाही तर त्यात सागराचा दोष नाही. आपल्याला आपली झोळी मजबूत करायची यासाठी हे अनुष्ठान आहे. आग्रह सोडला तरच अनुग्रह होईल. आयुष्यात फक्त परमात्म्याचे गुणगान केले पाहिजे. आपल्याकडे तीर्थंकरांची अद्भुत वाणी आहे. ऊर्जा आहे. फक्त त्यांचेच गुणगान व्हावे. जगाला जिनेश्वरीचे भक्त बनवायचे आहे.

पूज्य गोविंददेवगिरीजी महाराज म्हणाले की, आज याठिकाणी मला गुरू देवांचे मंगल आशिर्वचन प्राप्त झाले आहे. आचार्यश्रींचे अपार प्रेम मला प्राप्त झालेले आहे. ते आमच्या बेलापूर येथील घरी गोचरीसाठी यायचे, एवढे मोठे पुण्य आम्हाला लाभले. इथे जिनेश्वरी अनुष्ठान करणाऱ्या मातांना मी वंदन करतो. यातून पुढच्या पिढीला योग्य संस्कार मिळणार आहेत.

समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती आणि अहिल्यानगरचे सुपुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराजजी बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराजजी बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे. अशोक बाबूशेठ बोरा म्हणाले, गुरूदेवांच्या पावन भूमीत जिनेश्वरी ग्रुपचे अतिशय भव्य दिव्य अधिवेशन झाले आहे. आज इथले दृष्य पाहून केशरचा वर्षाव झाल्याची अनुभूती आली. पूज्य कुंदनऋषीजी म.सा., पूज्य प्रविण ऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने हे शक्य झाले असून समर्पण चातुर्मास ऐतिहासिक ठरत आहे. आज पूज्य गोविंददेवगिरीजी महाराज यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली आहे. शेवटी मंगलपाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# बारामती दूध संघाची वार्षिक सभा उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघाची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा कसबा येथील शरद सभागृहात उत्साहात पार पडली. सभेत दूध उत्पादकांना ७५ पैसे प्रतिलिटर दूध दरफरक, सभासदांना १३ टक्के लाभांश आणि कर्मचाऱ्यांना २५ टक्के बोनस देण्याची माहिती देण्यात आली.

सन २०२५-२६ मध्ये संघाचे सरासरी प्रतिदिन २.४६ लाख लिटर दूध संकलन झाले. दूध उत्पादकांना प्रतिलिटर ४० रुपये आणि प्राथमिक दूध संस्थांना ३५ रुपये, असा एकूण ७५ पैसे प्रतिलिटर दरफरक देण्यात आला. तसेच सभासदांना १३ टक्के लाभांश देण्यात आला. पशुखाद्य विक्रीवरील सहा




महिन्यांच्या कालावधीसाठी प्रतिपोते ५० रुपये दरफरक देण्यात आला. संघाच्या कायम कर्मचाऱ्यांना २५ टक्के बोनस आणि अडीच पगारांचे इन्सेंटिव्ह देण्यात आल्याचे सभेत सांगण्यात आले.**पाच कोटींचा स्वयंचलित प्लांट :**

सन २०२६-२७ मध्ये माळेगाव येथील नंदन डेअरीमध्ये सुमारे पाच कोटी रुपये खर्चाचा स्वयंचलित दुग्धपदार्थ निर्मिती प्लांट उभारण्याचे नियोजन आहे. तसेच १२ मेट्रिक टन क्षमतेचा दूध पावडर प्लांट, नंदन डेअरी व पशुखाद्य प्लांट येथे सौरऊर्जा प्रकल्प, नंदन डेअरी येथे मिनरल वॉटर प्लांट आणि भिगवण रोडवरील संघाच्या वसाहतीत व्यावसायिक इमारत उभारण्याचे प्रस्तावित आहे. संघाचे अध्यक्ष किशोर फडतरे यांनी प्रास्ताविकात संघाच्या कामकाजाचा आढावा घेतला. सभेला राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संदिप बांदल, पीडीसीसी बँकेचे संचालक संभाजी होळकर, बारामतीचे नगराध्यक्ष सचिन सातव, पंचायत समितीचे सभापती किरण तावरे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विश्वासनाना देवकाते, पीडीसीसी बँकेचे संचालक रणजित तावरे व दत्तात्रय येळेसर, संघाचे माजी अध्यक्ष सतीश तावरे, संघाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. योगेश राणे, संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी आणि सभासद उपस्थित होते.सभेच्या शेवटी संघाचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम गाढवे यांनी आभार मानले.

## दखल

### सासवडमध्ये स्वच्छता मोहिमेत सहा टन कचरा संकलित



**सासवड :** 'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियानांतर्गत सासवड नगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध भागांत विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. 'श्रमदानएक दिवस, एक तास, एक साथ' या उपक्रमातून नागरिकांना स्वच्छतेसाठी सामूहिक सहभागाचे आवाहन करण्यात आले.

या मोहिमेत नगरपालिका, नगराध्यक्षा आनंदी जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, नगरसेवक, कर्मचारी, विद्यार्थी, माजी सैनिक आणि नागरिक सहभागी झाले. पालखी तळ, सोनुरी रोड, एसटी स्टँड परिसर, पुणे रोड, गोदाजीराजे चौक ते सोपानदेव मंदिर तसेच जेजुरी नाका परिसरात स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेत सुमारे सहा टन कचरा संकलित करण्यात आला.

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांनीही जबाबदारी स्वीकारून उघड्यावर कचरा टाकू नये आणि सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करू नये, असे आवाहन करण्यात आले.या वेळी उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, आरोग्य सभापती राजन जगताप, बांधकाम सभापती माऊली जगताप, पाणीपुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे, गटनेते अजित जगताप आणि नगरसेवक बंडू राऊत सहभागी झाले. स्वच्छता मोहिमेत सर्व लोकप्रतिनिधींचा सहभाग असावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

### सासवडमध्ये मराठी भाषा सप्ताहाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**सासवड :** अभिजात मराठी भाषेचा समृद्ध वारसा जपण्याबरोबरच वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी सासवड येथे अभिजात मराठी भाषा सप्ताहाची उत्साहात सुरुवात झाली. सासवड नगरपरिषद, महाराष्ट्र साहित्य परिषद सासवड शाखा आणि पुरंदर कलामंच वाचन कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे कथा वाचन व पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

नगरपरिषदेच्या हितचिंतक मोफत वाचनालयाच्या सान्निध्यात वाचन कट्टा घेण्यात आला. यावेळी किशोरी अतुल पवार, संगीता कोलते आणि इंदिरा पवार यांनी विविध कथा सादर करून उपस्थित रसिकांना साहित्यविश्वाची अनुभूती दिली. वाचनालयातील विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शनही भरविण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेखा चौधरी यांनी केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माजी अध्यक्ष रावसाहेब पवार, अध्यक्ष ॲड. दिलीप निरगुडे, डॉ. सुरेश कोडीतकर, पाणीपुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे आणि पत्रकार हेमंत ताकवले यांनी मनोगत व्यक्त केले.स्नेहल देशपांडे यांनी मराठी भाषेचे महत्त्व विशद केले. इंग्रजी भाषा शिकणे ही आजची गरज असली, तरी मराठीचा वापर व जतन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.पुण्यातील डेक्कन महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा केंद्र सुरू करण्यास केंद्र शासनाने मंजुरी दिल्याच्या पार्श्वभूमीवर शाळा व महाविद्यालयांतील मराठी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या माध्यमातून निधी उपलब्ध व्हावा, अशी मागणी कार्यक्रमाचे संयोजक व महाराष्ट्र साहित्य परिषद सासवड शाखेचे कार्यवाह सतेज पाटील यांनी केली.

### विद्यार्थ्यांची दंतरोग तपासणी



**कवठे येमाई :** मराठी अभिजात भाषा गौरव दिनानिमित्त विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी दंतरोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांची दंतरोग तपासणी करून त्यांना दातांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.दंतचिकित्सक डॉ. आकाश उचाळे आणि डॉ. संतोष उचाळे यांनी विद्यार्थ्यांना दातांची नियमित स्वच्छता, योग्य पद्धतीने दात घासणे, संतुलित आहार, गोड पदार्थांचे अतिसेवन टाळणे तसेच दातांची समस्या जाणवल्यास वेळेत दंतचिकित्सकांचा सल्ला घेण्याबाबत मार्गदर्शन केले. तपासणीनंतर विद्यार्थ्यांना आवश्यक आरोग्यविषयक सूचना देण्यात आल्या.

# डिंभे उजवा कालव्याची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करा; भूसंपादनाचा मोबदला द्या

## ॲड. धर्मेंद्र खांडरे यांची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरूर :** कुकडी प्रकल्पांतर्गत डिंभे उजवा कालव्याची शिरूर तालुक्यातील अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करून शेतकऱ्यांना सिंचनाचे पाणी उपलब्ध करून द्यावे, तसेच प्रलंबित भूसंपादनाचा मोबदला तातडीने द्यावा, अशी मागणी भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. धर्मेंद्र खांडरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. याबाबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचीही भेट घेऊन निवेदन दिल्याचे खांडरे यांनी सांगितले.

डिंभे उजवा कालवा सुमारे ११६ किलोमीटर लांबीचा असून शिरूर तालुक्यातील विविध गावांतून गोलेगावपर्यंत जातो. कर्डेलवाडी येथील कि.मी. १०५ ते १०६ मधील भरावाचे काम तसेच सरदवाडी येथील सुमारे ४०० मीटर भरावाचे काम अद्याप अपूर्ण आहे. सरदवाडीच्या कामाची निविदाही काढण्यात आलेली नसल्याचे खांडरे यांनी



निदर्शनास आणून दिले.सरदवाडी, बो-हाडे मळा, थापेवाडी, तर्डोबाचीवाडी व गोलेगाव परिसरातील शेतकऱ्यांचा भूसंपादनाचा मोबदला प्रलंबित असून तो तातडीने देण्याची मागणीही करण्यात आली आहे. कुकडी प्रकल्पाचा सुधारित प्रकल्प अहवाल मंजूर करून ही सर्व कामे मार्गी लावावीत, अशी मागणी खांडरे यांनी केली.

हे काम पूर्ण झाल्यास शिरूर पंचक्रोशीतील अडीच हजारहून अधिक एकर शेतीला सिंचनाचा लाभ मिळण्याबरोबरच परिसरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मार्गी लागण्यास मदत होणार आहे. माजी आमदार बाबुराव पाचर्णे यांनी या कामासाठी वेळोवेळी अथक प्रयत्न केल्याचेही ॲड. धर्मेंद्र खांडरे यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी नगरसेवक कुऱ्हाडे यांची धाव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**आळंदी :** दिवेआगर येथे सहलीसाठी गेलेल्या विद्यार्थ्यांच्या अपघाताची माहिती मिळताच आळंदी नगरपरिषदेचे नगरसेवक तथा जय गणेश प्रतिष्ठानचे अध्यक्ष सागर उर्फ गोविंदा कुऱ्हाडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले.आपल्या प्रभागातील कोचिंग क्लासमधील विद्यार्थी या दुर्घटनेत सापडल्याची माहिती मिळाल्यानंतर कुऱ्हाडे यांनी संबंधित पालकांशी संपर्क साधला. त्यानंतर नगरपरिषद अधिकारी आणि पोलिसांशी समन्वय साधत ते दिवेआगर येथे पोहोचले. त्यांनी घटनास्थळी परिस्थितीची पाहणी करून मृत विद्यार्थ्यांचे मृतदेह पालकांच्या ताब्यात देण्याच्या प्रक्रियेत आवश्यक मदत केली. दुर्घटनेतून बचावलेल्या विद्यार्थ्यांचीही त्यांनी काळजी घेतली. विद्यार्थ्यांना बसमध्ये सुरक्षितपणे बसवून आळंदीच्या दिशेने रवाना करण्यात आले. आळंदी नगरपरिषदेचे नगरसेवक सागर उर्फ गोविंदा कुऱ्हाडे म्हणाले, ही घटना अत्यंत मन हेलावून टाकणारी आहे. अशा संकटाच्या वेळी पद किंवा राजकारणाचा विचार न करता माणुसकीच्या नात्याने मदतीला धावून जाणे ही आपली जबाबदारी आहे. मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. उर्वरित विद्यार्थ्यांना सुरक्षित घरी पोहोचविण्यासाठी प्रशासनासोबत पूर्ण सहकार्य करण्यात आले.संकटाच्या काळात प्रशासनाशी समन्वय साधत विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी तत्परतेने धाव घेतल्याबद्दल कुऱ्हाडे यांच्या भूमिकेचे कौतुक होत आहे.

# बारामती कृषी महाविद्यालयातील चार नवकल्पनांना यूके पेटंट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बारामती : कृषी क्षेत्रातील संशोधन आणि नवकल्पनांना चालना देणाऱ्या ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या डॉ. शरदचंद्र पवार कृषी व संलग्न महाविद्यालयातील पदवीच्या विद्यार्थ्यांच्या चार नवकल्पनांना यूके पेटंटची मान्यता मिळाली आहे. विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला मिळालेल्या या मान्यतेमुळे बारामतीच्या कृषी शिक्षण क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार आणि विश्वस्त तथा सचिव सुनंदा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी शिक्षणाला संशोधन, नवकल्पना आणि प्रत्यक्ष शेतीतील समस्यांच्या निराकरणाशी जोडण्यावर भर दिला जात आहे. त्यातून महाविद्यालयात संशोधनाभिमुख वातावरण निर्माण करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबत प्रत्यक्ष प्रयोग, संशोधन, नाविन्यपूर्ण कल्पना आणि बौद्धिक संपदा निर्मितीच्या प्रक्रियेत सहभागी करून घेतले जाते. विद्यार्थ्यांच्या कल्पनांना उपयुक्त स्वरूप देण्यासाठी महाविद्यालयाच्या संशोधन विभागाकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.

या कामात संशोधन सल्लागार प्रा. अभिषेक ढवाण आणि त्यांच्या संशोधन समूहाचे मार्गदर्शन व तांत्रिक सहकार्य महत्त्वपूर्ण ठरले. विद्यार्थ्यांच्या कल्पना विकसित करणे, प्रयोगांद्वारे त्यांची उपयुक्तता तपासणे आणि पेटंट प्रक्रियेसाठी मार्गदर्शन करण्याची भूमिका संशोधन समूहाने बजावली.

या यशासाठी ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे समन्वयक प्रा. ए. बी. रासकर, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल गोंडे, कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाच्या प्राचार्य आरती भोईटे, उपप्राचार्य एस. पी. गायकवाड, स्कूल ऑफ फार्मसीचे विभागप्रमुख प्रा. सागर शिंदे तसेच प्राध्यापक, संशोधन समूह, तांत्रिक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे योगदान लाभले.विद्यार्थ्यांच्या चार नवकल्पनांना मिळालेले यूके पेटंट हे महाविद्यालयात संशोधन आणि नवकल्पनांची संस्कृती विकसित होत असल्याचे द्योतक आहे. स्मार्ट शेती, आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष समस्यांवर उपाय शोधण्याच्या दिशेने महाविद्यालयाची वाटचाल सुरू आहे.

# विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर एआयचे दुष्परिणाम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयचा वापर विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी वाढत असला, तरी त्याच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या चिकित्सक विचारशक्ती, सर्जनशीलता, एकाग्रता आणि सामाजिक कौशल्यांवर परिणाम होण्याची शक्यता आहे, असे मत पुणे महापालिका प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षक शिवाजी बबनराव गावडे यांनी व्यक्त केले.



एआयच्या माध्यमातून निबंध, प्रकल्प तसेच गणिताची उदाहरणे काही क्षणांत सोडविता येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास सुलभ होत असला, तरी स्वतः विचार करून उत्तर शोधण्याची प्रक्रिया कमी होत आहे. विद्यार्थ्यांनी एआयकडून मिळालेले उत्तर थेट स्वीकारण्याऐवजी त्याची पडताळणी करणे आवश्यक आहे, असे गावडे यांनी सांगितले. एआयच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांची मौलिकता आणि सर्जनशीलता कमी होण्याची शक्यता आहे. निबंध किंवा प्रकल्प स्वतः तयार करण्याऐवजी एआयवर अवलंबून राहिल्यास विद्यार्थ्यांची स्वतंत्र लेखनशैली आणि कल्पनाशक्ती प्रभावित होऊ शकते. तसेच झटपट उत्तरांची सवय लागल्याने सखोल वाचन आणि दीर्घकाळ एकाग्र राहण्याची क्षमताही कमी होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

एआयकडून कधीकधी चुकीची माहिती किंवा संदर्भ दिले जाऊ शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मिळालेली माहिती विश्वासार्ह स्रोतांमधून तपासणे गरजेचे आहे. एआयचा वापर कॉपी करण्यासाठी न करता एखादी संकल्पना समजून घेण्यासाठी करावा. गृहपाठ पूर्णपणे एआयकडून करून घेण्याऐवजी स्वतः अभ्यास करून आवश्यक तेथे एआयची मदत घ्यावी, असे आवाहन गावडे यांनी केले.

एआय हे विद्यार्थ्यांसाठी सहाय्यक साधन असावे; त्यांच्या विचारशक्तीचा पर्याय होऊ नये. शिक्षणाचा उद्देश केवळ गुण मिळविणे नसून स्वतंत्रपणे विचार करणारा विद्यार्थी घडविणे हा आहे, असेही गावडे यांनी स्पष्ट केले.

# आंबेगाव पूर्व भागात दुष्काळी परिस्थितीची वळसे पाटलांकडून पाहणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** महाराष्ट्र शासनाने नुकताच राज्याच्या अनेक भागात दुष्काळ जाहीर केला आहे. परंतु यातून आंबेगाव तालुक्याला वगळण्यात आल्याने शेतकरी संतापलेला आहे. त्यात आंबेगाव तालुक्याचा पूर्व भाग अधिकच दुष्काळाच्या झळा जाणवत आहेत. याच अनुषंगाने शनिवार दि. ३ रोजी मा.मंत्री आमदार दिलीपराव वळसे पाटील यांनी संपूर्ण पूर्वभागातील गावांचा दुष्काळी दौरा केला. यात पहाडदरा, शिरदाळे, धामणी, लोणी, वडगावपीर, मांदळेवाडी या गावांचा समावेश होता. यात शिरदाळे आणि मांदळवाडी या गावांची भयाण परिस्थिती पाहायला मिळाली. यावेळी त्यांच्या सोबत जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, पंचायत समिती सदस्या अंकिता वाळुंज, महसूल विभाग अधिकारी, कृषी विभाग अधिकारी उपस्थित होते. शिरदाळे येथे सोयाबीन, बटाटा तसेच इतर पिकांची देखील पाहणी केली व परिस्थिती गंबीर असल्याचे सांगितले.शिरदाळे ग्रामस्थानी देखील आम्हाला शेती व्यतिरिक्त एखादा उद्योग व्यवसाय मिळावा किव्हा चखूउ सारखा प्रकल्प उभारावा अशी मागणी केली. आमच्याकडे कायमच दुष्काळ असतो त्यामुळे हा दुष्काळ आम्हाला नवीन नसल्याचे स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले. यावेळी अनेक शेतकरी, अनेक विभागाचे अधिकारी तसेच मा. सरपंच मनोज तांबे, गणेश तांबे, उपसरपंच बिपिन चौधरी, मा. उपसरपंच मयुर सरडे, सोसायटी प्रतिनिधी जयदीप चौधरी, मा. सरपंच बाबाजी



चौधरी, अनिकेत चौधरी, कल्पेश सरडे, ग्रामविकास अधिकारी सोनाली जाधव हे उपस्थित होते.माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करत परिस्थितीचा आढावा घेतला.

# शेतकऱ्यांना डाळिंब, पेरूच्या कलम रोपांचे वितरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** शेतकऱ्यांना शास्त्रशुद्ध तंत्रज्ञान आणि गुणवत्तापूर्ण लागवड साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत गणेशखिंड येथील विभागीय कृषी संशोधन केंद्रात उपक्रम घेण्यात आला. यावेळी पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विद्यापीठाने विकसित केलेल्या 'फुले भगवा सुपर' डाळिंब आणि 'फुले अमृत' पेरू या वाणांच्या कलम रोपांचे वितरण करण्यात आले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या हस्ते सुमारे ३५ ते ४० प्रगतिशील शेतकऱ्यांना रोपांचे वितरण करून सत्कार करण्यात आला. शेतकऱ्यांनी विद्यापीठाने विकसित



केलेल्या आंबा, डाळिंब, पेरू, सीताफळ, अंजीर आणि भाताच्या विविध वाणांमुळे तसेच गुणवत्तापूर्ण रोपांच्या उपलब्धतेमुळे उत्पादनक्षमता आणि आर्थिक प्रगतीला मदत होत असल्याचे सांगितले.

कुलगुरू महात्मा फुले कृषी विद्यापीठ डॉ. विलास खर्चे यांनी बदलत्या हवामान परिस्थितीत शेतीसमोरील आव्हानांचा सामना करण्यासाठी शास्त्रज्ञ आणि शेतकरी यांच्यात समन्वय आवश्यक असल्याचे सांगितले. विद्यापीठाचे नवीन वाण आणि आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर असल्याचे त्यांनी नमूद केले.संशोधन संचालक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ डॉ. प्रशांत बोडके यांनी नवीन वाण आणि तंत्रज्ञान अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे सांगितले.सहयोगी संशोधन संचालक, विभागीय कृषी संशोधन केंद्र, गणेशखिंड डॉ. दत्तात्रेय लाड यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. सुनील लोहाटे यांनी केले. यावेळी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, पुणे डॉ. सुभाष भालेकर तसेच संशोधन केंद्रातील अधिकारी, कर्मचारी आणि प्रगतिशील शेतकरी उपस्थित होते.

# स्वच्छता अभियानातून जलसंधारणाला बळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २ अंतर्गत 'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियानातून पाणलोट क्षेत्रातील स्वच्छता, जलसंधारण आणि जलस्रोतांच्या संवर्धनाला चालना देण्यात आली. 'स्वच्छ भारत, विकसित भारत' या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या अभियानात लोकसहभागावर विशेष भर देण्यात आला.

अभियानांतर्गत जलसंधारण संरचनांची स्वच्छता व देखभाल, पावसाच्या पाण्याचे संकलन, शोष खड्डे व पुनर्भरण खड्ड्यांना प्रोत्साहन तसेच नाले, ओढे, तलाव आणि शेततळ्यांच्या संरक्षणाची कामे करण्यात आली. 'एक दिवस, एक तास, एक साथ' या उपक्रमातून नागरिकांनी श्रमदानात सहभाग घेतला.वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनातून पर्यावरण संवर्धनालाही चालना देण्यात आली. ग्रामस्थ, शेतकरी, बचतगट, युवक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेत स्वच्छता व जलसंधारणाच्या कामांना हातभार लावला. 'स्वच्छ जलस्रोत : सुरक्षित जलस्रोत' या संदेशातून जलस्रोत स्वच्छ ठेवण्यासोबतच पाण्याचा कार्यक्षम वापर आणि पाणलोट क्षेत्राचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले. स्वच्छता, जलसंधारण आणि लोकसहभाग या त्रिसूत्रीतून जलसंधारणाची कामे अधिक प्रभावी व शाश्वत करण्याचा संकल्प अभियानातून करण्यात आला.

## द·ख·ल



## निघोज येथील श्री मळगंगा विद्यालयाची सायन्स पार्कला वैज्ञानिक सहल

**निघोज :** टाटा टेक्नॉलॉजी आणि स्टार्स फोरम पाबळ यांच्या सहकार्याने हिंदवी शिक्षण संस्थेच्या श्री मळगंगा विद्यालय, निघोज विद्यार्थ्यांसाठी पिंपरी-चिंचवड येथील सायन्स पार्कला वैज्ञानिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या विद्यालयात स्टार्स फोरम, विज्ञान आश्रम पाबळ आणि टाटा टेक्नॉलॉजी माध्यमातून व्यावसायिक अभ्यासक्रम राबविला जातो. या अंतर्गत सजीव सृष्टी व मानवी सेवा या विषयांना धरून विविध उपक्रम, आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे दिले जातात. त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांनी सायन्स पार्कला भेट दिली. या भेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी तेथील विविध वैज्ञानिक प्रयोग, नाविन्यपूर्ण प्रतिकृती आणि टाटा टेक्नॉलॉजी सहकार्याने सुरू असलेल्या कल्पकघर ला भेट दिली व विविध क्टिव्हिटी केल्या. यामुळे विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाचे पालकांनी स्वागत करून विद्यालयाचे अभिनंदन केले आहे. या सहकार्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर कवाद आणि सचिव शिवाजीराव वराळ यांनी स्टार्स फोरम पाबळ व टाटा टेक्नॉलॉजी पुणे यांचे आभार मानले आहेत. यावेळी संस्थेचे अध्यक्ष कवाद व सचिव वराळ यांनी सांगितले की विद्यार्थ्यांना व्यवसायीक शिक्षण देणे ही काळाची गरज असून विद्यालयातील सर्व शिक्षक मुख्याध्यापक यांनी अतिशय कल्पकतेने व्यवसायीक शिक्षण मिळण्यासाठी पिंपरी चिंचवड या औद्योगिक शहरात सहलींचे आयोजन करीत त्यांना कारखाने दाखवीत उद्योग व्यवसायाचे धडे या निमित्ताने दिले आहे.

## समर्थ कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये जागतिक फार्मासिस्ट दिन उत्साहात साजरा




**निघोज :** समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी, बेल्हे (बांगरवाडी), येथे जागतिक फार्मासिस्ट दिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. इंटरनॅशनल फार्मास्युटिकल फेडरेशन (ऋखझ) यांनी यंदाची 'निरोगी भविष्यासाठी फार्मासिस्टचे सक्षमीकरण' ही संकल्पना जाहीर केली असून, या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये फार्मसी व्यवसायाबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्राध्यापकांच्या स्वागतपर मनोगताने झाली. त्यानंतर जागतिक फार्मासिस्ट दिनाची संकल्पना, उद्देश आणि फार्मसी व्यवसायातील बदलत्या भूमिकेचे महत्त्व याबाबत माहितीपूर्ण सत्र घेण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थी व शिक्षकांनी फार्मासिस्ट शपथ घेतली. नैतिक फार्मसी व्यवसायाच्या माध्यमातून रुग्णसेवा आणि मानवतेची सेवा करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. प्राचार्य डॉ. संतोष घुले यांनी आरोग्यसेवा, औषधनिर्माण उद्योग, संशोधन तसेच सामुदायिक आरोग्यसेवा या क्षेत्रांमध्ये फार्मासिस्टची बदलती भूमिका स्पष्ट केली. औषधांचे वितरण करण्यापुरती फार्मासिस्टची भूमिका मर्यादित नसून, रुग्णांच्या सुरक्षिततेपासून औषधांविषयी योग्य मार्गदर्शनापर्यंत फार्मासिस्ट महत्त्वाची भूमिका बजावतात, असे त्यांनी सांगितले.

## डॉ. मनोहर सूर्यवंशी यांना पी.एच.डी.

**श्रीगोंदा :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा येथील रसायनशास्त्र विभागप्रमुख तथा सहयोगी प्राध्यापक डॉ. मनोहर सूर्यवंशी यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने रसायनशास्त्र विषयातील पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून अधिकृत मान्यता दिली आहे. विद्यापीठाचे मान्यता पत्र नुकतेच प्राप्त झाले असून, त्यांच्या शैक्षणिक, अध्यापन आणि संशोधन क्षेत्रातील कार्याची ही महत्त्वपूर्ण पावती मानली जात आहे.



कर्जत तालुक्यातील चांदे (खुर्द) येथील शेतकरी कुटुंबातून आलेल्या डॉ. सूर्यवंशी यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर पदवी, पदव्युत्तर शिक्षण तसेच सेट परीक्षा उत्तीर्ण करत त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटविला. सन २००८ मध्ये श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात रुजू झाल्यानंतर त्यांनी अध्यापनासोबत संशोधन आणि शैक्षणिक प्रशासनाच्या क्षेत्रातही सातत्यपूर्ण योगदान दिले.सन २०२३ मध्ये त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त केली. राष्ट्रीय सेवा योजना, परीक्षा अधिकारी, विज्ञान शाखाप्रमुख यांसह महाविद्यालयातील विविध महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे सांभाळल्या आहेत. रसायनशास्त्र विषयातील नामांकित जर्नलमध्ये त्यांचे संशोधनपर लेख प्रकाशित झाले आहेत.त्यांच्या संशोधन कार्याची, शैक्षणिक पात्रतेची आणि योगदानाची दखल घेत विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मान्यता दिली आहे.

# माजी आ. झावरे, ना. विखे पाटील भेटीची तालुक्यात चर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माजी आमदार नंदकुमार झावरे पाटील यांची भेट घेतल्याने झावरे पुन्हा जिल्हा बँक लढवणार का याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे.

झावरे पाटील हे तसे माजी खासदार बाळासाहेब विखे यांचे ज्येष्ठ सहकारी म्हणून जिल्ह्यात कार्यरत होते. १९८५ ते १९९५ पर्यंत ते विधानसभेचे सदस्य होते. मात्र त्यानंतर माजी खासदार विखे पाटील यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर त्यांच्या संपर्कात थोडी कटुता आली.

मात्र त्यानंतर नामदार राधाकृष्ण विखे पाटील व झावरे पाटील यांचा समन्वय चांगला राहिला. झावरे पाटील यांनी पंधरा वर्षांपूर्वी जिल्हा बँकेची निवडणूक लढवली होती मात्र त्यात त्यांना अपयश आले.

झावरे पाटील यांचे सुपुत्र राहुल झावरे यांनी कान्हूरपठार पंचायत समिती गणातून पंचायत समिती निवडणूक लढले त्यात ते विजयी झाले आणी माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांच्या पाठबळाने ते सभापती झाले.

त्यानंतरच्या कार्यकाळात तेही राजकारणापासून अलिप्त राहिले. माजी आमदार झावरे पाटील हे जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना जिल्ह्यात त्यांचा मोठा दबदबा होता.

काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून विधानसभा सदस्य



तसेच पक्षातील प्रमुख पदांना न्याय देणारे माजी आमदार झावरे पाटील हे एक अभ्यासू व आक्रमक नेते म्हणून त्यांनी विधानसभेत लौकिक मिळवीला होता. मात्र १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत माजी खासदार शंकरराव काळे आणी त्यांच्यात वितुष्ट निर्माण झाल्याने त्यानंतर काँग्रेसची उमेदवारी वसंतराव झावरे पाटील यांना मिळाली ते सुद्धा १० वर्ष आमदार होते. माजी असूनही एक अभ्यासू नेतृत्व म्हणून नंदकुमार झावरे पाटील यांचा दबदबा राजकारणात कायम असून विखे पाटील आणी त्यांची ही भेट त्यांना पुन्हा एकदा जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून सक्रिय राजकारणात कार्यरत करते की काय याकडे जिल्ह्यातील जनतेचे लक्ष वेधले गेले आहे.

जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरण्याचा सोमवार दि.५ अंतिम दिवस असून आजपर्यंत जवळपास ९०० अर्जाची विक्री झाली असून सोमवारी अंतिम दिवशी कोणकोणते नेतेमंडळी उमेदवारी अर्ज भरतात याकडे जिल्ह्यातील जनतेचे लक्ष वेधले गेले आहे.

विखे पाटील - थोरात युतीची चर्चा जोरदार सुरू असून माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील हे अध्यक्षपदाच्या स्पर्धेत तसेच माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांची कन्या जयश्री थोरात या उपाध्यक्ष पदाच्या स्पर्धेत असल्याची चर्चा होत असून पारनेर सोसायटी मतदारसंघांतील संभाव्य बंडखोरी टाळण्यासाठी विखे पाटील माजी आमदार नंदकुमार झावरे पाटील यांना पुन्हा एकदा सक्रीय राजकारणात आणून पारनेरचा गड एकतर्फी जिंकतात की काय याकडे तालुक्याचे लक्ष वेधले गेले आहे.

झावरे पाटील यांच्या नावाने त्यांच्या भोंद्रे गावचा सोसायटीचा ठराव घेण्यात आल्याने एक जुने जाणते अभ्यासू नेतृत्व म्हणून झावरे पाटील यांना जिल्हा बँकेत आणीत मार्गदर्शक म्हणून झावरे पाटील यांची भुमिका जिल्हा बँकेला आणखी सक्षम करण्यासाठी नामदार विखे पाटील यांची चाल निलेश लंके यांना रोखण्यासाठी उपयोगी पडणार काय याचीच चर्चा तालुक्यात सुरू आहे.

## वृद्ध महिला जखमी प्रकरणाने एसटी प्रशासनाला घेरले!

### तक्रारीनंतरही कारवाई नाही? वार्ताहराला कथित दमदाटीचा व्हिडिओ पुरावा पोलिसांकडे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** जामखेड आगाराच्या जामखेड-पुणे बसमधून वृद्ध महिला प्रवासी पडून जखमी झाल्याच्या प्रकरणात तक्रार करूनही अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यातच या घटनेबाबत विचारणा करणाऱ्या दैनिक राष्ट्र सह्याद्रीचे राशीन वार्ताहर ऋषभ अनंतसिंग परदेशी यांना संबंधित चालक-वाहक व कर्मचाऱ्यांकडून कथित शिवीगाळ, दमदाटी व अरेरावी करण्यात आल्याची तक्रार करण्यात आल्याने एसटी प्रशासन आणि पोलीस प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.

२८ सप्टेंबर २०२६ रोजी जामखेड आगाराची जामखेड-पुणे बस क्रमांक चक-१४-इढ-४१२२ प्रवासात असताना वृद्ध महिला प्रवासी बसमधून पडून जखमी झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.



अपघातानंतर जखमी महिलेला तत्काळ वैद्यकीय मदत मिळाली का? उपचाराची व्यवस्था कोणी केली? घटनेची नोंद एसटी प्रशासनाने कशी घेतली? तसेच जखमी प्रवाशाची स्थिती असताना बस पुढे का रवाना झाली? या प्रश्नांची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या घटनेबाबत माहिती घेत असताना चालक विष्णू मारुती घुले, वाहक दत्तात्रय रामचंद्र गुरसाळी तसेच श्रीगोंदा आगारात कार्यरत असल्याचे सांगण्यात आलेले त्रिंबक भीमराव बरबडे यांनी कथित दमदाटी व अरेरावीची भाषा वापरल्याचा आरोप ऋषभ परदेशी यांनी केला आहे.

या संपूर्ण घटनाक्रमाचे स्वतः च्या मोबाईलवर चित्रीकरण केले असून, संबंधित व्हिडिओ फुटेज जामखेड आगार, श्रीगोंदा आगार, अहिल्यानगर येथील वरिष्ठ एसटी अधिकारी तसेच पोलीस प्रशासनाकडे पाठविल्याचे तक्रारदाराने सांगितले आहे. त्यामुळे या व्हिडिओची स्वतंत्रपणे पडताळणी करून सत्य परिस्थिती समोर आणण्याची मागणी होत आहे.

सामान्य प्रवाशांच्या अडचणी आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी मांडणाऱ्या वार्ताहरालाचं कथित दमदाटी किंवा अरेरावीचा सामना करावा लागत असेल, तर हा प्रकार गंभीर असल्याचे ऋषभ परदेशी यांनी म्हटले आहे.

## वन्यजीवांचे संरक्षण करणे प्रत्येकाचे कर्तव्य : न्यायमूर्ती भारती डांगरे



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** वन्यजीवांचे संरक्षण ही केवळ वनविभागाची जबाबदारी नसून त्यासाठी न्यायपालिका, प्रशासन, स्थानिक नागरिक आणि समाजातील विविध घटकांचा समन्वय आवश्यक आहे. माळढोकसारख्या संकटग्रस्त वन्यजीवांच्या अधिवासाचे संरक्षण, जैवविविधतेचे जतन आणि भावी पिढ्यांसाठी नैसर्गिक वारसा सुरक्षित ठेवण्यासाठी सर्वांनी संवेदनशील बनत जबाबदारीने कर्तव्य पार पाडू असे आवाहन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती भारती डांगरे यांनी केले. ते रेहेकुरी (ता.कर्जत) वन्यजीव सप्ताह भेटी प्रसंगी बोलत होते. यावेळी सहकारी न्यायमूर्ती आशिष चव्हाण, रेहेकुरी वन परीक्षेत अधिकारी मारुती मुळे यांच्यासह वन अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भारती डांगरे आणि आशिष चव्हाण कर्जतच्या दौऱ्यावर आले होते. आपले नियोजित कामकाज पार पाडल्यानंतर त्यांनी कर्जत तालुक्यातील रेहेकुरी माळढोक-काळवीट अभयारण्यास भेट दिली. सध्या रेहेकुरी येथे वन्यजीव सप्ताहानिमित्त विविध जनजागृती व संवर्धनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात सहभागी होत उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी बोलताना न्यायमूर्ती आशिष चव्हाण म्हणाले की, पर्यावरणात वन्यजीवांचे अनन्य साधारण महत्व असून त्याचे रक्षण आणि संवर्धन करणे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. वनविषयक कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास तस्करी रोखण्यात यश मिळेल. त्यामुळे कठोर कार्यवाहीबाबत सर्वांनी दक्ष राहिले पाहिजे असे म्हंटले. यावेळी न्यायमूर्ती डांगरे आणि चव्हाण यांनी रेहेकुरीची पाहणी करीत तेथील माहितीचा आढावा घेतला.

## कोळसांगवीत 'स्वच्छतेचा गांधीमार्ग' ग्रामस्थ-विद्यार्थ्यांनी गाव झाडले!



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५७व्या जयंतीनिमित्त पाथर्डी तालुक्यातील कोळसांगवी येथे ग्रामस्थ आणि जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी हातात झाडू घेत संपूर्ण गाव स्वच्छ करण्याचा अनोखा उपक्रम राबविला. गांधीजींच्या 'ग्रामस्वच्छता' आणि 'ग्रामस्वराज्य' या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देत राबविलेल्या या अभियानाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमातून गावाने ५ हजार रुपयांचे रोख बक्षीस पटकावले. 'राजीव फाउंडेशन'चे संस्थापक अध्यक्ष तथा 'गांधी ग्लोबल फॅमिली'चे सदस्य सलीम शेख यांच्या संकल्पनेतून या ग्रामस्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले.

त्यामुळे स्वच्छतेसोबत सामाजिक बांधिलकीचाही आदर्श कोळसांगवीने निर्माण केला. या अभियानात जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांसह बशीर शेख, गणेश धनवडे, दगडू धनवडे, अतुल घुले, श्रीधर घुले, गुलाब घुले, पांडुरंग आंधळे, पत्रकार शिवाजी बोंद्रे, रमेश जोशी,करण बोंद्रे, रामदास साळवे, वैभव घुले, शरद घुले यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंच युवराज फुंदे, शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामपंचायत सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## दहिगाव-ने कृषि विज्ञान केंद्राचा राष्ट्रीय गौरव 'उत्कृष्ट कार्य करणारे कृषि विज्ञान केंद्र' पुरस्काराने सन्मान

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**शहरटाकळी :** श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था, कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव-ने, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर यांना सन २०२५ मधील 'उत्कृष्ट कार्य करणारे कृषि विज्ञान केंद्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुणे येथे आयोजित वार्षिक विभागीय कार्यशाळेत केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. श्यामसुंदर कौशीक यांनी या पुरस्कार स्वीकारला.

कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव-ने चे कामकाज अध्यक्ष आ. डॉ. नरेंद्र घुले, आ. चंद्रशेखर घुले तसेच संस्थेचे सर्व विश्वस्त मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावी पद्धतीने सुरू आहे. भारतीय कृषि अनुसंधान परिषद (आय. सी.ए.आर) अंतर्गत अटारी, झोन-८ यांच्या वतीने महाराष्ट्र, गुजरात व गोवा राज्यातील एकूण ८२ कृषि विज्ञान केंद्रांचा ९ वा वार्षिक विभागीय कार्यशाळा दिनांक २९ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२६ दरम्यान आय.सी.ए.आर.- अटारी, पुणे येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेदरम्यान कृषि विज्ञान केंद्र दहिगाव-ने यांना सन २०२५ मधील उत्कृष्ट कार्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार कृषि विज्ञान केंद्र दहिगाव-नेचे प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. श्यामसुंदर कौशिक यांनी बिधानचंद्र कृषि विश्वविद्यालय, मोहनपूर, नादिया, पश्चिम बंगालचे माजी कुलगुरू डॉ. एम. एम. अधिकारी यांच्या शुभहस्ते स्वीकारला. यावेळी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे माजी उपमहासंचालक (कृषि विस्तार) डॉ. पी. दास , भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे माजी उपमहासंचालक (कृषि विस्तार) डॉ. के. डी. कोकाटे, आय. सी.ए.आर.- अटारी, पुणेचे संचालक डॉ. एस. के. रॉय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. जी. के. ससाणे, आय. सी.ए.आर.- अटारी, पुणेचे प्रधान शास्त्रज्ञ (कृषि विस्तार) डॉ. सय्यद शाकीर अली यांची प्रमुख उपस्थिती होती. या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष आ. डॉ. नरेंद्र घुले पाटील, आ. चंद्रशेखर घुले पाटील तसेच डॉ. क्षितीज घुले पाटील, सर्व विश्वस्त मंडळ, संस्थेचे सचिव श्री. अनिल शेवाळे, सह सचिव इंजी. रवींद्र मोटे यांनी कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख व सर्व स्टाफ चे अभिनंदन केले.

## आनंद नगरी खरेदी महोत्सवात विविध उत्पादनांची रेलचेल

**अहिल्यानगर :** राधेय महिला गृह उद्योग यांच्या वतीने महिला उद्योजकांना तसेच स्थानिक व्यावसायिकांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'आनंद नगरी खरेदी महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव शनिवार दि .१७ व रविवार दि.१८ ऑक्टोबर रोजी जैन स्थानक, सारस नगर, अहिल्यानगर येथे होणार आहे. महोत्सवात घरगुती उद्योगांमधून तयार केलेल्या विविध वस्तू व उत्पादनांचे स्टॉल असणार आहेत. यामध्ये विविध प्रकारच्या साड्या, बेडशीट, कपडे, ज्वेलरी, हस्तकला वस्तू, डेकोरेशनचे साहित्य, ब्युटी प्रॉडक्ट्स, खाद्यपदार्थ आदींचा समावेश राहणार आहे. त्यामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी विविध प्रकारच्या वस्तूंची खरेदी करता येणार आहे. याशिवाय गेम स्टॉल व लकी ड्रॉ हे महोत्सवाचे विशेष आकर्षण राहणार आहे. महिला व गृहउद्योगातून तयार होणाऱ्या उत्पादनांना ग्राहक मिळावेत, महिलांच्या उद्योगांना प्रोत्साहन मिळावे आणि स्थानिक व्यवसायांना चालना मिळावी, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

# लोहार, सुतार, कुंभार, चांभार, व १२ बलुतेदारांना स्वतंत्र पॅकेज द्या

### कष्टकरी बलुतेदार समाजावर उपासमारीची वेळ येणार

**भास्कर पोपळघट । राष्ट्र सह्याद्री**

**कान्हुरपठार :** महाराष्ट्रातील दुष्काळाचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत असताना राज्यातील २६५ तालुके शासनाने दुष्काळग्रस्त घोषित केले आहेत. दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहेच त्यांना मदत झालीच पाहिजे त्यांच्या शेतातील पिक तर गेलेच पण जनावरांना या पुढे जगवाचे कसे हा प्रश्न त्यांच्या समोर आहे असे असले तरी त्याच्यासोबत पिढ्यान्पिढ्या गावगाड्याचा मुख्य सोबती असणाऱ्या व गावगारडा चालविणाऱ्या १२ बलुतेदार समाजातील घटकांचा जगण्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. सरकारच्या दुष्काळी मदतीच्या घोषणांमध्ये शेतकऱ्यांचा प्रामुख्याने विचार

> भयंकर दुषकाळ पडल्याने कुंभाराच्या व्यावसायावर याचा विपरीत परिणाम झाला आहे आमचे पारंपारिक व्यावसाय पूर्ण पणे बंद होण्याच्या मार्गावर आहेत आता मुलांचे शिक्षण, घरातील खर्च, कुटुंबातील आजारपण हा खर्च कसा करवा हा प्रश्न माझ्या समोर आहे. शासनाने या गरीब समाजाकडे लक्ष देणे गरजेचे आहे
>
> **महेंद्र भिकाजी मंदिलकर**
> **कुंभार समाज**

होत असताना गावच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या पारंपरिक कष्टकरी बाराबलुतेदार

समाजाकडे मात्र अपेक्षित लक्ष दिले जात नसल्याची भावना व्यक्त होत आहे. हा समाज महाराष्ट्रातील आहे की बाहेरचा आहे हा खरा प्रश्न आहे

दुष्काळ हा शेतकऱ्यांच्या शेतात पडतो पण त्याची झळ गावातील प्रत्येक घराला कुटुंबाला बसते. शेतकऱ्याच्या हातात पैसा नसला की सर्वप्रथम गावातील पारंपरिक व्यवसायांची उलाढाल थांबते. शेताची अवजारे तयार करणाऱ्या लोहाराचा भाता थांबतो त्याच्या हाताला काम रहात नाही, सुताराचे काम कमी होते, कुंभाराची भट्टी शांत होते, चांभाराचा व्यवसाय मंदावतो. त्याचप्रमाणे न्हावी, परीट, गुरव, कोळी, सोनार आणि इतर पारंपरिक सेवा देणाऱ्या कुटुंबांवरही त्याचा थेट परिणाम होतो.

एकेकाळी १२ बलुतेदार ही ग्रामीण सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेची महत्त्वाची साखळी होती. आज आधुनिक

> शासनाने केवळ शेतकऱ्यांचा विचार न करता शेतीवर अवलंबून असलेल्या बारा बलुतेदार समाजालाही विषेश घटक म्हणून विचार करावा आणि त्यांना थेट आर्थिक मदत काढलेल्या कर्जाची कर्जमाफी द्यावी अन्यथा महाराष्ट्राचा गावगाडा चालवणारा बलुतेदार गावातून हद्दपार होणार आहे.
>
> **संदिप थोरात**

अर्थव्यवस्थेमुळे त्यांच्या व्यवसायांचे स्वरूप बदलले आहे यांत्रिकी करणाने बलुतेदार समाजाच्या संपूर्ण कामावर त्याचा गंभीर परिणाम झाला आहे

तरीही ग्रामीण भागातील हजारो कुटुंबे अजूनही पारंपरिक व्यवसाय, लहान लहान उद्योग आणि शेतीशी जोडलेल्या कामावर



अवलंबून आहेत. मात्र दुष्काळी मदतीचे निकष ठरविताना 'शेतकरी' किंवा 'शेतमजूर' या चौकटीबाहेरील कुटुंबांचे काय? त्यांच्या साठी शासन काय निर्णय घेते. हा प्रश्न आता गंभीरपणे विचारण्याची वेळ आली आहे. लोहार, कुंभार यांसह सुतार, चांभार आणि इतर पारंपरिक व्यवसायिक कुटुंबांवर दुष्काळाचा मोठा आर्थिक परिणाम होत आहे. शेतीची कामे कमी झाली की त्यांच्याकडे येणारे ग्राहक कमी होतात.

दैनिक **राष्ट्र सह्याद्री**


# बारागाव नांदूरसह १५ गावांचा पाणीपुरवठा बंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : दुष्काळजन्य परिस्थितीत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा खंडित करू नये, असे शासनाचे स्पष्ट निर्देश असतानाच बारागाव नांदूरसह १५ गावांची प्रादेशिक पाणीपुरवठा योजना १ ऑक्टोबरपासून बंद करण्यात आली आहे. त्यामुळे सुमारे ६० हजार नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असून ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे. बारागाव नांदूर, डिग्रस, राहुरी खुर्द, तमनर आखाडा, देसवंडी, कोंढवड, शिलेगाव, केंदळ बुद्रुक, केंदळ खुर्द, पिंप्री चंडकापूर, वळण, मांजरी, मानोरी, आरडगाव आणि तांदुळवाडी या गावांना या योजनेतून पाणीपुरवठा होतो. नळपट्टीची थकबाकी वसूल करून योजना समितीकडे जमा करावी, या मागणीसाठी पाणीपुरवठा बंद करण्यात आल्याचे सांगण्यात येते. योजनेत सुमारे ७ हजार ९८० नळजोडण्या असून प्रत्येक जोडणीसाठी वार्षिक १ हजार ८०० रुपये नळपट्टी आकारली जाते. सन २०२५-२६ मधील सुमारे साडेआठ लाख रुपयांची नळपट्टी थकीत असून सप्टेंबर २०२६ अखेरच्या चालू वर्षातील नळपट्टीपैकी ४० टक्के रक्कम ग्रामपंचायतींनी वसूल करून समितीकडे जमा करण्याची मागणी आहे. दरम्यान, योजनेवर महावितरणचे तब्बल ३ कोटी ४७ लाख रुपये वीज बिल, तर पाटबंधारे विभागाची ९ लाख ४८ हजार रुपये पाणीपट्टी थकीत आहे. वार्षिक वीज बिल सुमारे एक कोटी रुपये असून योजना जुनी झाल्याने जलवाहिनी व पंपांच्या दुरुस्तीवरही मोठा खर्च होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दुष्काळात पिण्याचा पाणीपुरवठा खंडित करू नये, अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे प्रशासनाने आर्थिक थकबाकीचा प्रश्न मार्गी लावून योजना तातडीने पूर्ववत करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



# सहकाराच्या उज्ज्वल भविष्यासाठी नारीशक्तीचा सहभाग आवश्यक : ना.विखे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी / प्रवरानगर** : महिलांचा सहभाग सहकार क्षेत्रासाठी केवळ पर्याय नसून सहकाराच्या उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक असलेला आधार आहे, असे प्रतिपादन जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले. सहकार भारतीच्या वतीने शिर्डी येथे आयोजित दोन दिवसीय 'नारीशक्ती आणि सहकारिता अधिवेशनाचे' उद्घाटन मंत्री विखे-पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय जोशी, राष्ट्रीय महिला अध्यक्षा रेवती शेंदूर्णीकर, प्रदेशाध्यक्ष दत्ताराम चावके, महिला प्रदेशाध्यक्षा वैशाली आवाडे, महामंत्री विवेक जुगादे, संघटनमंत्री संजय पाचपोर, उपाध्यक्ष रवीकाका बोरावके आदी उपस्थित होते.

विखे-पाटील म्हणाले, देशाच्या अर्थव्यवस्थेत नारीशक्तीचा सहभाग महत्त्वाचा ठरत आहे. शेती, उद्योग, बँकिंग, तंत्रज्ञानाबरोबरच सहकार चळवळीतही यशस्वी नेतृत्व करण्याची क्षमता महिलांमध्ये आहे. बचत गटांच्या चळवळीतून महिलांनी आर्थिक उलाढालीचा इतिहास निर्माण केला आहे. बचत गटांना सहकार क्षेत्राशी जोडून महिलांना अधिक संधी दिल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चित्र बदलू शकते.

बचत गटांना दिलेल्या कर्जाची वसुली शंभर टक्के असल्याचे सांगून बँकिंग क्षेत्रात शिस्त आणण्यासाठी महिलांना अधिक संधी देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सहकार मंत्रालयाची स्थापना झाल्यानंतर केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांनी सहकार क्षेत्रातील बदलांमध्ये महिलांना प्राधान्य दिले आहे. सहकार चळवळीत महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी सहकार भारतीने प्राथमिक सहकारी सोसायट्यांच्या कार्यप्रणालीबाबतही काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून महिलांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. 'सहकारातून समृद्धी' हे ब्रीद घेऊन केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या माध्यमातून निर्णय घेतले जात असल्याचे त्यांनी सांगितले. महिला सक्षमीकरणासाठी तीन कोटी 'लखपती दीदी' बनविण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर, वैशाली आवाडे आणि विवेक जुगादे यांनीही मार्गदर्शन केले. अधिवेशनाच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात आलेल्या स्मरणिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

# हॉटेल व्यावसायिकावर हल्ला, मुख्य आरोपी २४ तासांत गजाआड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी** : येवती (ता. श्रीगोंदा) हद्दीत पैशांच्या हव्यासापोटी एका तरुणावर फावडे अन् कोयत्याने प्राणघातक हल्ला करत रोख रक्कम व मोबाईल लांबवणाऱ्या गुंडांविरुद्ध बेलवंडी पोलिसांनी अत्यंत धडक अन् वेगवान कारवाई केली आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून चक्रे हलवत बेलवंडी पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे या गुन्ह्यातील मुख्य आरोपी श्रीधर बाळू ठोंबरे याला अवघ्या काही तासांत शिरूर येथून शिताफीने अटक करण्यात यश आले आहे. पोलिसांच्या या जलद आणि धडक कारवाईचे नागरिक अन् व्यापाऱ्यांकडून कौतुक होत आहे.

ढवळगाव येथील २६ वर्षीय हॉटेल व्यावसायिक आदेश सुरेश आढाव हे येवती परिसरात असताना आरोपींनी त्यांना अडवून पैशांची मागणी केली. करायचे ते कर, पण पैसे देऊनच जा अशी दमदाटी करत आरोपींनी वाद घातला. वादाचे रूपांतर थेट हिंस्र हल्ल्यात झाले; आरोपींनी हातातील फावड्याने आढाव यांच्या थेट डोक्यावर वार केला, तर कोयत्याच्या मुठीने पाठीवर बेदम मारहाण केली. त्यानंतर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आढाव यांच्याकडील रोख रक्कम आणि मोबाईल फोन बळजबरीने हिसकावून घेत लाठ्या-काठ्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देत आरोपी पसार झाले होते.



या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात आरोपी श्रीधर बाळू ठोंबरे, प्रतीक सोबले, रोहन चोरमले (सर्व रा. येवती, ता. श्रीगोंदा) आणि वैभव झिटे (रा. गुनाट, ता. शिरूर) या चौघांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले होते. घटनेनंतर पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी बेलवंडी पोलिसांच्या पथकाने तातडीने तपासाची चक्रे फिरवली. मुख्य आरोपी शिरूर भागात लपून बसल्याची गुप्त माहिती मिळताच पथकाने त्या ठिकाणी छापा टाकून मुख्य सूत्रधार श्रीधर बाळू ठोंबरे याच्या मुसक्या आवळल्या. पोलिसांच्या या तत्परतेमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले असून इतर फरार आरोपींचा शोध तीव्र केला आहे.

सदरची यशस्वी व धडक कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर आणि पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल गाडीलकर, पो. हे. कॉ.दादासाहेब क्षीरसागर, पो. हे. कॉ.भाऊसाहेब यमगर, पोलीस नाईक शरद गांगर्डे, पोलीस कॉन्स्टेबल विनोद पवार व भापकर यांच्या पथकाने केली.

# नेमबाजीत त्रिमूर्तीच्या पाच खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या वतीने संगमनेर कॉलेज येथे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती महाविद्यालयाच्या खेळाडूंनी नेमबाजीमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. १० मीटर एअर पिस्तूल आणि पीप साईट रायफल या प्रकारांत खेळाडूंनी पदकांची कमाई करत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले.

१० मीटर एअर पिस्तूल प्रकारात साईराज देव्हारे याने सुवर्णपदक, तर युवराज थोरात याने रौप्यपदक पटकावले. पवन वाघ याने या प्रकारात पाचवा क्रमांक मिळवला. पीप साईट रायफल प्रकारात समीक्षा सोनावळे हिने सुवर्णपदक, तर आरती जाधव हिने रौप्यपदक मिळवले.

या स्पर्धेतील कामगिरीच्या जोरावर साईराज देव्हारे, युवराज थोरात, समीक्षा सोनावळे, आरती जाधव आणि पवन वाघ यांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

खेळाडूंना प्रा. छबुराव काळे आणि शारीरिक शिक्षण संचालक प्रा. प्रशांत जायगुडे यांचे मार्गदर्शन लाभले. नियमित सराव, मेहनत, शिस्त आणि एकाग्रतेच्या जोरावर हे यश मिळाल्याचे महाविद्यालयाकडून सांगण्यात आले.

या यशाबद्दल त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड. सुमतीताई घाडगे पाटील, उपाध्यक्षा ड. स्नेहलताई घाडगे-चव्हाण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. गौरव आमले पाटील, प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे, समन्वयिका डॉ. अनुराधा गोरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# मिठाई व्यापाऱ्याच्या घरात चोरी

## ११ लाख ४० हजारांचा ऐवज लंपास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा खुर्द येथील मिठाई व्यापारी रामभाऊ गणपत जगताप (वय ७२) यांच्या देशपांडे नगरातील घरात चोरट्यांनी खिडकीचे लोखंडी गज तोडून प्रवेश केला. घरातील सोन्याचे दागिने, चांदीचे शिक्के आणि पाच लाख रुपये रोख असा एकूण ११ लाख ४० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना १ ऑक्टोबरच्या मध्यरात्री घडली.

जगताप यांचे नेवासा खुर्द येथे 'जगताप मिठाईवाले' नावाचे दुकान आहे. १ ऑक्टोबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास जगताप कुटुंबीयांसह घरात झोपले होते. २ ऑक्टोबर रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास जगताप यांना जाग आली. त्यावेळी बेडरूमचा दरवाजा उघडा असल्याचे आणि खोलीतील साहित्य अस्ताव्यस्त पडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

घराची पाहणी केली असता खिडकीचे लोखंडी गज तोडल्याचे दिसून आले. घटनेची माहिती मिळताच नेवासा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी श्वान पथक व ठसे तज्ज्ञांना पाचारण करून तपासणी केली. त्यानंतर कपाटाची पाहणी केली असता सोन्याचे दागिने व रोकड चोरीस गेल्याचे आढळले. चोरीस



गेलेल्या ऐवजात सोन्याचे ब्रासलेट, चैन, अंगठ्या, मंगळसूत्र, लहान मुलांचे सोन्याचे दागिने, हिऱ्याची अंगठी, चांदीचे २० शिक्के आणि पाच लाख रुपयांची रोकड यांचा समावेश आहे.

या प्रकरणी जगताप यांनी नेवासा पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध फिर्याद दिली आहे. फिर्यादीवरून नेवासा पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप शिंदे पुढील तपास करीत आहेत.

# 'आम्ही प्रयोगशाळेतील उंदीर नाही' एमपीएससी परीक्षा पद्धत बदलण्यास विद्यार्थ्यांचा विरोध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षा पद्धतीत पुन्हा बदल करण्याच्या हालचालींमुळे परीक्षार्थींमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. गर्दीच्या दबावाखाली नवीन वर्णनात्मक परीक्षा पद्धत रद्द करून पुन्हा वस्तुनिष्ठ पद्धत आणण्याच्या चर्चेला विद्यार्थ्यांनी विरोध केला आहे. परीक्षा पद्धतीत वारंवार बदल न करता सध्याची वर्णनात्मक पद्धत कायम ठेवावी, अशी मागणी करीत विद्यार्थ्यांनी पुण्यातील टिळक चौकात ठिय्या आंदोलन सुरू केले.

स्वसुख निरभिलाष खिद्यते लोकहेतोः

राज्यभरातून पुण्यात एमपीएससी परीक्षेची तयारी करण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला. ऐनवेळी परीक्षा पद्धतीत बदल केल्यास गेल्या दोन-तीन वर्षांपासून वर्णनात्मक पद्धतीनुसार तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक व मानसिक फटका बसणार असल्याचे आंदोलकांनी सांगितले. विद्यार्थी गुणवंत सावळकर म्हणाला, आम्ही प्रयोगशाळेतील उंदीर नाही. आमच्यावर वारंवार प्रयोग करून परीक्षा पद्धत बदलली जाऊ नये. प्रशासनाला कशा प्रकारचे अधिकारी अपेक्षित आहेत, त्यानुसार परीक्षा पद्धती निश्चित केली पाहिजे. केवळ गर्दीच्या मागणीवरून परीक्षा पद्धत ठरविणे योग्य नाही.

तसेच गर्दीच्या मागणीवरूनच अधिकारी निवडायचे असतील, तर थेट चिठ्ठ्या टाकून अधिकारी निवडावेत, असा संतप्त सवाल त्याने केला. गेल्या काही वर्षांपासून हजारो विद्यार्थी वर्णनात्मक पद्धतीनुसार अभ्यास करीत आहेत. त्यामुळे अचानक पद्धत बदलल्यास त्यांची आतापर्यंतची तयारी व्यर्थ जाण्याची शक्यता आहे. परीक्षा पद्धतीतील त्रुटी असतील तर त्या दूर करून सध्याची पद्धत अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. इतर राज्यांमध्येही लोकसेवा आयोगाच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेतल्या जात असल्याचा दाखला विद्यार्थ्यांनी दिला. सध्याच्या पद्धतीची पहिली संपूर्ण परीक्षा आणि तिचा निकाल समोर येण्यापूर्वीच ती अपयशी ठरविणे योग्य नसल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. परीक्षा पद्धतीत सातत्य ठेवून विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

# सहा गावांची ९९ लाखांची पाणीपट्टी थकीत; कर्मचाऱ्यांचे वेतन रखडले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : संत ज्ञानेश्वर संयुक्त पाणी व्यवस्थापन समिती, भेंडा-कुकाणा व इतर चार गावांतील पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन तातडीने अदा करावे, वेतनात वाढ करावी आणि भविष्यात वेतन वेळेवर मिळण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी कर्मचाऱ्यांनी केली आहे. सहा ग्रामपंचायतींकडून समितीकडे तब्बल ९९ लाख ९ हजार ४१७ रुपये पाणीपट्टी थकीत असल्याने त्याचा परिणाम कर्मचाऱ्यांच्या वेतनावर होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ५ ऑक्टोबरपर्यंत वेतनाचा प्रश्न मार्गी न लागल्यास ६ ऑक्टोबरपासून कामबंद आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

संत ज्ञानेश्वर संयुक्त पाणी व्यवस्थापन समितीमार्फत भेंडा बुद्रुक, कुकाणा, तारवडी, आंतरवाली, चिलेखनवाडी आणि भेंडा खुर्द या सहा गावांना पाणीपुरवठा केला जातो. कर्मचारी २०११ पासून नियमितपणे पाणीपुरवठ्याची जबाबदारी पार पाडत आहेत. मात्र वाढती महागाई आणि वेतनातील अनियमिततेमुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

थकीत पाणीपट्टीमध्ये भेंडा बुद्रुक ग्रामपंचायतीकडे ४३ लाख ७७ हजार ४२९, कुकाणाकडे ३५ लाख १५ हजार ९९७, तारवडीकडे १० लाख १९ हजार ३७८, आंतरवालीकडे ४ लाख ८२ हजार ९५७, चिलेखनवाडीकडे ३ लाख ८९ हजार ७४६ आणि भेंडा खुर्दकडे २ लाख ४ हजार ९१० रुपये थकीत आहेत.

थकीत पाणीपट्टी तातडीने समितीकडे जमा करण्याच्या सूचना ग्रामपंचायतींना द्याव्यात तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन तत्काळ अदा करावे, अशी मागणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप न केल्यास सहा गावांच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

> दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब अत्यंत जपून आणि योग्य पद्धतीने वापरणे ही केवळ समितीची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. ग्रामपंचायतींनी पाणीपट्टी नियमित भरावी आणि नागरिकांनीही पाण्याचा अपव्यय टाळून सहकार्य करावे, जेणेकरून सर्व गावांचा पाणीपुरवठा सुरळीतपणे सुरू ठेवता येईल.
>
> **वैशाली शिंदे, अध्यक्ष,**
> **संत ज्ञानेश्वर संयुक्त पाणी व्यवस्थापन समिती**

# श्रीरामपूर खरीप हंगाम दुष्काळ

## ५६ नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती । अहवाल ८ दिवसात सादर करा

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यात खरीप हंगाम २०२६ मधील 'ट्रिगर-१' (दुष्काळ सदृश परिस्थिती) अंतर्गत शेती पिकांचे पंचनामे करण्याचे संयुक्त आदेश तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, गटविकास अधिकारी (BDO) स्मिता वाघ आणि तालुका कृषी अधिकारी उल्हास राक्षे यांनी जारी केले आहेत. तालुक्यात ५६ नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, पुढील ८ दिवसांत सर्व पंचनामे पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे कडक निर्देश देण्यात आले आहेत. जिओ टॅगिंगसह संयुक्त पंचनामे बंधनकारक सर्व पंचनामे अत्यंत पारदर्शक पद्धतीने करावे, नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे करताना



जिओ टॅगिंग (Geo-Tagging) करून फोटो काढणे अनिवार्य करण्यात आले आहे. महसूल, कृषी आणि पंचायत विभागाच्या समन्वयाने हे पंचनामे संबंधित गावचे तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्या संयुक्त स्वाक्षरीनेच ग्राह्य धरले जातील, असे तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, बीडीओ स्मिता वाघ आणि तालुका कृषी अधिकारी उल्हास राक्षे यांनी स्पष्ट केले आहे.

हा दुष्काळ पंचनाम्यांचा कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचा असून याद्वारे बाधित शेतकऱ्यांना मदत मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे तालुक्यातील सर्व शेतकरी बंधूंनी आपल्या क्षेत्रातील पंचनामे करताना नियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आवश्यक ती माहिती देऊन पूर्ण सहकार्य करावे, जेणेकरून एकही गरजू शेतकरी या प्रक्रियेतून वंचित राहणार नाही. या मोहिमेसाठी संपूर्ण श्रीरामपूर तालुक्यातील गावांची विभागणी करून प्रत्येक गावनिहाय तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक आणि मूल्यमापन तपासणी अधिकाऱ्यांची नियुक्ती व मोबाईल क्रमांकासह सविस्तर यादी जाहीर करण्यात आली असल्याचे तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, बीडीओ स्मिता वाघ आणि तालुका कृषी अधिकारी उल्हास राक्षे म्हणाले.

# मुठेवाडगाव शिवारात अवैध वाळू वाहतूक करणारे वाहन पकडले

## ३ लाख ५ हजारांचा मुद्देमाल जप्त



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगाव शिवारात अवैधरीत्या वाळू वाहतूक करणाऱ्या टाटा कंपनीच्या ईंट्रा पिकअप वाहनावर श्रीरामपूर तालुका पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत दोन ब्रास वाळूसह सुमारे ३ लाख ५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, वाहनचालक व मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ ऑक्टोबर रोजी अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांना खानापूर ते वडाळा महादेव मार्गावरील मुठेवाडगाव शिवारात अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस पथकाने या परिसरात सापळा रचला. खानापूरकडून येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या टाटा ईंट्रा पिकअप वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये वाळू आढळून आली. चौकशीत वाहनचालकाने आपले नाव साहेबराव मारुती गायकवाड (वय २४, रा. खानापूर, ता. श्रीरामपूर) असे सांगितले. वाळू वाहतुकीचा परवाना नसल्याचे तपासणीत स्पष्ट झाले. वाहनमालक म्हणून सुनील देवकर (रा. गोर्धणी, ता. श्रीरामपूर) यांचे नाव समोर आले. पोलिसांनी वाहन व दोन ब्रास वाळू असा एकूण ३ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर आणि परी पोलीस उपअधीक्षक कल्पना पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सचिन धनाड, अनिल शेंगाळे, रमेश्वर वेताळ, संतोष दरकर व अक्षय भोसले सहभागी झाले.